NYAY NISHTHA

न्यायनिष्ठा

लेखक : बिन्ते इस्लाम

अनुवादक : प्रो. अब्दुर्रहमान शेख

''अल्लाह, असीम दयावंत व कृपावंतच्या नावाने''

प्रस्तावना

'न्याय' इस्लामी शिकवणीचा महत्वाचा अंग आहे. एखाद्या वस्तूला दोन बराबर भागात अशा प्रकारे विभागले जावे की कुणालाही कमी जास्त वाटू नये ह्याला अरबी भाषेत 'अदल' म्हणतात.

समाजात सुखशांती नांदण्यासाठी, हकदारांना (जरूतमंदलोकांना) त्यांचा हक्क मिळण्यासाठी आणि सर्व सामान्यांना त्यांचा हक्क व न्याय मिळण्यासाठी न्यायाची समाजातं स्थापना होणे आवश्यक आहे. ज्या देशात अथवा समाजात न्यायिक व्यवस्था नसेल तिथे स्थिरता, शांतीचे वातावरण राहात नाही.

इस्लाम एक वैश्विक जीवन पध्दती आहे आणि समस्त विश्वात शांती व सुखसमृध्दी स्थापित करण्याचा दावेदार आहे. त्यामुळे इस्लामने आपल्या शिकवणी मध्ये न्यायाला अनन्य स्थान दिले आहे.

हा ग्रंथ प्रसिध्द इस्लामनिष्ठ स्त्री लेखक माननीय बिन्ते इस्लाम साहेबा मरहूम यांनी लिहिला आहे. यात दिवंगत लेखिकेने पूर्ण विचाराने आणि गांभियनि न्यायाचा विषय आणि त्याच्या वैशिष्टयांना हाताळले आहे. कौटुंबिक आणि सार्वजनिक जीवनात न्यायाच्या स्वरूपाला सविस्तरपणे सांगितले आहे. ह्या विषयीचे अधिकतर हदीस कथन ह्या ग्रंथात वाचकांसाठी उपलब्ध आहेत.

आमची प्रार्थना आहे की अल्लाह मुस्लिमांना आपापल्या क्षेत्रात न्याय स्थापन करण्यासाठीचे कार्यकर्ते बनवोत आणि दिवंगत बहिणीची हा शुभ प्रयत्न त्यांच्यासाठी परलोक शिदोरी ठरो. (आमीन)

न्यायाचे स्वरुप, ताकीद आणि वैशिष्ट्यें

पवित्र कुरआनचा अध्याय अल् मायदा वचन (आयत) क्रमांक आठ मध्ये अल्लाह आदेश देतो की,

"हे लोकांनो, ज्यांनी ईमान आणले (श्रध्दा ठेवली) अल्लाहच्यासाठी सत्यावर दृढ राहणारे आणि न्यायाची साक्ष देणारे बना. एखाद्या दलाचे शत्रुत्व तुम्हाला न्यायापासून दूर जाण्यास बाध्य करू नये. न्याय करा हे सदाचारापेक्षा जास्त चांगले कृत्य आहे. अल्लाहचे भय बांळगून कार्य करा जे काही तुम्ही करता अल्लाह त्याला पूर्ण जाणून आहे."

माननीय अबू हुरैरा (र) कथन करतात की प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे,

"की प्रत्येक दिवस ज्यात सूर्य मावळतो. त्यात मनुष्याच्या प्रत्येक जोडीवर दान देणे आवश्यक आहे. आणि कोणी लोकांच्या दरम्यान न्याय करील तर ते सुध्दा दान आहे." (बुखारी)

अल्लाहच्या मार्गात दानधर्म करणे मोठे वैशिष्टयपूर्ण कृत्य आहे आणि प्रत्येक दिवशी प्रत्येक जोडीवर दान देणे आवश्यक बनते परंतु अनिवार्य नाही की हे दान जे दररोज दिले जाते पैशाच्या रूपातच दिले जावे तर ते कृतीच्या रूपात सुध्दा दिले जाऊ शकते.

एखादे असे काम करणे ज्याने अल्लाहच्या निर्मितीला (लोकांना) फायदा होत असेल तर ते दान आहे. ह्या प्रकारच्या दानाचे एक उत्तम उदाहरण हे आहे की अल्लाहच्या दासां दरम्यान न्यायनिष्ठेवर दृढ राहून कार्य केले पाहिजे व आचरण ठेवले पाहिजे. एखाद्या ओझ्याला दोन भागात अशा प्रकारे विभागून दिले पाहिजे की त्या दोघांपैकी कुणातही कणभर ही कमी जास्त होता कामा नये. ह्याला अरबी भाषेत 'अदल' म्हणतात. तसेच न्याय (अदल्) चा दुसरा अर्थ सरळ करणे बराबर करणे, न्याय करणे, हकदाराला त्याचे पूर्ण हक्क देणे इ. समाजात न्याय प्रस्थापित करण्यासाठी आणि लोकांना संतुष्ट ठेवण्यासाठी न्यायनिष्ठेने काम करणे अत्यावश्यक आहे. ज्या राज्यातील राज्यकर्ते आपल्या

प्रजेशी न्यायाने वागतील आणि प्रजा सुध्दा एक दुसऱ्याशी न्यायाने वागेल तर ह्या समाजातील लोक सुखी व संतुष्ट राहतील की त्यांना त्यांचे हक्क प्राप्त होत आहेत. अशा स्थितीत तो समाज दृढ बनेल. लोक आपापल्या कामात मग्न राहातील आणि भांडणतंटे, उपद्रव व अत्याचार अन्याय तिथे होणार नाही, लोक द्रोह करणार नाहीत. परंतु ज्या समाजात लोकांत त्यांचे हक्क मिळणार नाही. त्यांच्याशी अन्याय होईल आणि ते भयभीत राहतील तर लोक तिथे अत्याचारित, पीडित, अन्यायग्रस्त व उपद्रवग्रस्त बनतील आणि लोक आपापल्या कामात मग्न राहणार नाहीत. अशा समाजात द्रोह होईल.

दिव्य कुरआनातील अध्याय ''अल्‌अअराफ'' ची आयत (वचन) द्वारा अल्लाह प्रेषित (स.) यांना संबोधून आदेश देत आहे,

''हे प्रेषित (स.) सांगा माझ्या पालन कर्त्याने न्याय करण्याचा आदेश दिला आहे.''

अध्याय 'अन्‌हल' आयत नंबर ९० मध्ये अल्लाह स्पष्टोक्ती करीत आहे.

''नि:संदेह, अल्लाह न्याय आणि उपकार करण्याचा आदेश देतो.''

अध्याय 'अलहुजरात' आयत नंबर ९ मध्ये अल्लाह आदेश देत आहे की,

''आणि न्याय करा. नि:संदेह अल्लाह न्याय करणाऱ्यांसोबत प्रेम करतो.''

अध्याय 'अशशुरा' आयत नंबर १५ मध्ये प्रेषित (स.) यांना संबोधित करून आदेश दिला आहे की, लोकांना सांगा,

''मला आदेश दिला गेला आहे की तुमच्या दरम्यान न्याय करावा.''

तसेच अध्याय 'अलहदीस' आयत नंबर २५ मध्ये अल्लाह स्पष्ट आदेश देत आहे की,

''आम्ही आमच्या प्रेषितांना स्पष्ट आदेश देऊन पाठविले आणि त्यांच्या सह ग्रंथ आणि न्यायतुला पाठविली जेणे करून लोक न्यायावर दृढ राहतील.''

तसेच प्रेषित (स) यांचे हदीस मध्ये न्यायाचे वैशिष्टय आणि अन्यायाचे आणि अत्याचाराचा धिक्कार यांचे तपशीलवार वर्णन आले आहे.

माननीय अबू सईद (र.) कथन करतात की प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे की,

''कयामतच्या दिवशी (पुनरुत्थानदिनी) अल्लाहला अतिप्रिय लोक ते असतील जे न्यायनिष्ठ असतील. अल्लाहचे सानिध्य न्यायनिष्ठ राजाला लाभेल जो राजा अत्याचारी व अन्यायी असेल तो अल्लाहचा त्वेष आणि राग आपणावर ओढवेल आणि तो अल्लाहपासून सर्वात दूर बसलेला असेल.'' (तिरमिजी)

माननीय अबू मुसा शअरी (र.) कथन करतात की प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे की,

''हे सुध्दा अल्लाहचा आदर करण्याचा प्रकार आहे की प्रौढ, वयस्कर माणसाला आदराने वागविले जावे आणि कुरआनच्या त्या हाफीज (कुरआन तोंड पाठ असणारी व्यक्ती) ला आदर पूर्वक वागविले जावे जो त्यात काही कमी जास्त करीत नाही आणि त्या राजाची इज्जत केली जावी जो न्याय करतो.'' (अबु दाऊद)

माननीय अबु हुरैरा (र.) कथन करतात की प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे की,

''कयामतच्या दिवशी तुमच्यापासून हकदारांचे हक्क अदा केले जातील येथ पावेतो की जर एखाद्या शींगवाल्या बकरीने बेशींगवाली शेळीवर अत्याचार केला असेल त्याच्याशी बेसींगवाली बकरीचा बदला घेतला जाईल.'' (मुस्लिम)

स्पष्ट आहे की जनावरे आपल्या कृत्यापायी उत्तरदायी नाही. त्यांना जाब विचारला जात नाही. ह्या उदाहरणाने प्रेषित (स.) यांचा हेतु हा आहे की एखाद्या मनुष्याला थोडे जरी अधिकार प्राप्त झाले आणि अधिकारात राहून त्याने अन्याय करून एखाद्यावर अत्याचार केला असेल तर कयामतच्या दिवशी अत्याचार पीडिताकडून बदला घेण्यास सांगितले जाईल. दुसऱ्या मनुष्यावर थोडे सुध्दा अधिकार प्राप्त नसेल असा एकही मनुष्य नाही. म्हणून प्रत्येक मनुष्य ह्या धोक्यात अडकलेला आहे. कधी तो आपल्या एखाद्या अधिकाराचा वापर करून दुसऱ्यावर अत्याचार करेल आणि मग अल्लाहसमोर गिरफ्तार

होईल. प्रत्येक अन्यायी माणसाचा निर्णय दुसऱ्यासाठी अत्याचार ठरतो. आणि जो कोणी न्यायाचा पक्ष सोडून दुसऱ्या कुणाचे हक्क मारत असेल तर तो अत्याचारी लोकात सामील होतो. आणि कयामतच्या दिवशी तो आपल्या ह्या अपराधापायी कैद केला जाईल.

माननीय अबू सईद खुदरी (र.) कथन करतात की प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे. की प्रेषित (स.) काही वस्तू वाटप करत होते तेव्हड्यात एक व्यक्ती प्रेषित (स.) यांच्यावर ओणवा झाला. तेव्हा प्रेषित (स.) यांनी त्याला एका झाडाच्या फांदीने ढूसणी दिली. ती व्यक्ती चालू लागली. तेव्हा प्रेषित (स.) यांच्या मनात विचार आला की त्या व्यक्तीवर अन्याय झाला आहे. त्यामुळे त्याला बदला घेण्यास सांगितले. त्याने सांगितले की,

''हे प्रेषित (स.) मी आपणास माफ केले.'' (निसानी)

ह्या वरून स्पष्ट होते की न्याय करण्याचा जिथे प्रश्न येतो तिथे प्रेषित (स.) स्वतःला सुध्दा सवलत घेत नसत. जेव्हा कधी प्रेषित (स.) यांच्या हाताने एखाद्याला त्रास झाला तर त्वरित स्वतःला बदल्यासाठी दुसऱ्या समोर, अत्याचारित माणसा समोर पेश करीत असत.

प्रकरण २ रे

कौटुंबिक जीवनात न्याय

माननीय अब्दुल्लाह बिन उमर (र.) निवेदन करतात की प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे की न्याय करणारे व न्यायावर चालणारे लोक अल्लाहच्या उजव्याबाजूच्या चमकत्या मेंबरवर असतील. म्हणजे ते लोक जे निर्णय देतात तर न्यायाने आणि आपल्या कुटूंबियांच्या सोबत सुध्दा न्यायाने वागतात. आणि त्यांच्या अधिकारात जे काही असते त्यांच्या संबंधी न्यायानेच वागतात.'' (निसानी)

ज्या प्रमाणे उल्लेख आला आहे की एखाद्या व्यक्तीला थोडा सुद्धा अधिकार प्राप्त झाला तर तो परिक्षेत उतरतो. म्हणजे त्याच्या अधिकारा खालील लोकांशी न्याय पूर्ण व्यवहार आहे किंवा नाही. शासनकर्त्या लोकांविषयी पाहिले जाईल की ते प्रजेबरोबर न्याय पूर्ण व्यवहार करतात की नाही. न्यायाधिश व इतर अधिकारी यांना पारखले जाईल की ते लोकांशी न्यायनिष्ठपणे निर्णय देतात की नाही. त्याचप्रमाणे कुटूंबियाशी कुटूंबप्रमुखाने न्यायपूर्ण व्यवहार करणे आवश्यक आहे. मालकाची जबाबदारी आहे की त्याने आपल्या नोकरांशी न्यायपूर्ण व्यवहार करावा. मजदूराला त्याच्या मजूरीचा पूर्ण मोबदला वेळेत दिला गेला पाहिजे. जो कोणी ह्या परिक्षेत सफल होईल म्हणजे त्याच्या अधिकारातील लोकांशी तो न्याय पूर्ण व्यवहार करत होता तर त्याला शुभ वार्ता दिली गेली आहे की तो अल्लाहच्या समिप असलेल्या चमकत्या मेबंर (स्टेज) वर बसलेला असेल.

कुटूंबातील लोकांशी न्यायपूर्ण व्यवहार

मनुष्याच्या अत्यंत निकटचे संबंध आपल्या कुटूंबातील लोकांशी असते. त्याच्या पत्नी मूलबाळांशिवाय आईवडील कधी भाऊ, बहिण राहतात. एखाद्या ठिकाणी आजी आजोबा, मावशी इ. लोक सुध्दा त्या कुटूंबात राहतात. कधी एखादा दूरचा नातेसंबंधी त्या कुटूंबाचा एक भाग असतो. हे आवश्यक नाही की कुटूंबातील सर्वांशी अशा वेळी प्रेम संबंध व विश्वासाचे वातावरण रहावे. त्यांच्या आपापसात तक्रारी असतात. उदा. सासू सूनेत, ननंद आणि भाभी व देवरानी जेठांणी ह्याच्यात नेहमीच खटके उडत असतात. अशा स्थितीत कुटूंब

प्रमुखाच्या खांद्यावर मोठी जबाबदारी घेऊन पडते. त्याला अशा पध्दतीने वागावे लागते की त्या सर्व लोकांना न्याय पूर्ण व्यवहाराने त्यांचे हक्क त्या सर्वांना मिळतील. प्रमुखाला लक्ष द्यावे लागते की कुटूंबातील लोकामध्ये प्रेमाचे, सौहार्दाचे आणि सहकार्याचे वातावरण नेहमीच राहील. तरीपण घरातील लोक एकमेकांशी भांडत राहतीलच. परंतु हे सत्य आहे की जर कुटूंबातील सर्वांसोबत न्यायपूर्ण व्यवहार असेल तर त्यांच्या आपापसातील संघर्षाचे महत्त्वाचे कारण नष्ट होईल. परंतु वस्तुस्थिती ह्याच्या उलट असते. फार कमी लोकांत ही समजदारी आणि ज्ञान असते ज्यामुळे कुटूंबात न्यायपूर्ण वागणुकीने सर्वांचे हक्क अदा करण्याचे प्रयत्न होतात. होते असे की काही लोक फक्त आपल्या आईवडीलांकडे व बहिण भावांकडे जास्त झुकलेले असतात. काय आदर्श भाऊ आणि पुत्र बनण्यासाठी दुष्ट पती बनणे आवश्यक आहे? आईवडील, भाऊबहिणींकडे जास्त झुकाव आणि पत्नीशी अन्यायपूर्ण वागणूक ! तसेच चांगला पती बनण्यासाठी आपल्या आईवडीलांना, भाऊबहिनींना दूर करावे हे सुध्दा आवश्यक नाही. आईवडीलांपेक्षा जगात दुसरे उपकारकर्ते कोणीही नाही आणि भाऊबहिणीच्या प्रेमापेक्षा अधिक प्रेम जगात कुठे मिळणार? ह्या सर्वांना विसरून जाणे शक्य आहे? याच बरोबर हे सुध्दा अत्यंत आवश्यक आहे की जी स्त्री आपले आईवडील, भाऊबहीण आणि सर्व सगे संबंधीना सोडून आपले घरदार व कधी कधी माय देश सोडून आपल्या पतीच्या घरी येते. ती सुध्दा आपले विशिष्ट हक्क घेऊन येते. आणि पत्नीच्या हक्कांना पायदळी तुडवून जगात कोणताच पती 'आदर्शपती' अथवा न्यायनिष्ठ व्यक्ती बनू शकत नाही.

एका मुस्लिमाला ह्या वास्तविकतेवर ईमान ठेवले (श्रध्दा) पाहिजे की अल्लाहने मनुष्याला तेच आदेश दिले ज्यांचे पालन करणे मनुष्याला शक्य आहे. जर घरातील लोकांची जबाबदारी पेलण्याची योग्यता आणि शक्ती मनुष्यात नसती तर अल्लाहने कुटूंबाची जबाबदारी लोकांवर टाकलीच नसती. आता अल्लाहचा आदेश हाच आहे की कुटूंब प्रमुखाने आपल्या कुटूंबातील लोकांशी न्यायपूर्ण व्यवहार ठेवावा. तर ह्याचा अर्थ हाच आहे की हे न्यायपूर्ण व्यवहार मनुष्याच्या आवाक्यातील कार्य आहे. आवश्यकता फक्त ह्याच गोष्टींची आहे की,

१) अल्लाहने त्या सर्व लोकांचे जे हक्क निश्चित केले आहे त्यांचे पूर्ण ज्ञान कुटूंब प्रमुखाला असणे अत्यावश्यक आहे आणि

२) त्याच्या मनात कुटूंबातील लोकांच्या हक्कांविषयी परलोकात हिशोब (जाब विचारणी) अल्लाह समोर द्यावा लागेल ह्या विषयीची पक्की धारणा मनात घर करून बसली पाहिजे. ह्यामुळे त्या व्यक्तीने आपल्या मुक्तीसाठी त्या हक्कांना अदा करणे अत्यावश्यक ठरते. ''हे ज्ञान'' आणि ''ही धारणा'' मनुष्याला सत्य मार्गावर चालण्यास प्रवृत्त करते. येथे ही दोन मुळतत्वें कायमचे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. कारण मनुष्याची धारणा तर तशी आहे परंतु त्याला ह्याचे ज्ञान नाही की कुटूंबातील लोकांशी न्यायपूर्ण व्यवहार कसा करावा तर तो कुटूंब प्रमुख आपल्या कुटूंबातील लोकांशी अन्यायच करील. तो समजून चालेल की मी न्यायपूर्ण व्यवहार करत आहे. उलट त्याला हे ज्ञान प्राप्त आहे की कुटूंबातील प्रत्येकांचे काय काय हक्क आहेत. परंतु परलोकध्यास त्याच्या मनात नसेल तर ती व्यक्ती अशा स्थितीत सुध्दा लोकांवर अन्यायच करील. अन्याय पूर्ण व्यवहारांशी तोच वाचू शकतो ज्याला माहित (ज्ञान) आहे की कुटूंबातील प्रत्येकांचे हक्क कोणकोणते आहेत आणि दुसरीकडे त्याला परलोकध्यास असणे आवश्यक आहे की मृत्यू नंतर परलोकातील शाश्वत जीवनात ह्या लोकांच्या हक्कांविषयीच्या जबाबदारीतून मुक्त असेल.

पत्नी आणि संबंधीतांविषयीचे हक्क

असे अनेक लोक आहेत जे आपल्या कुटूंबियांच्या भांडण तंट्यापासून इतके चिंतीत असतात की जणु काही त्यांच्या जीवनात रस शिल्लकच नाही, एकीकडे आईवडील आणि भाऊबहिण यांना वाटते की त्यांच्यावर अन्याय होत आहे तर दुसरीकडे पत्नीची तक्रार वेगळीच असते. तिला वाटते की जगात सर्वात जास्त अन्याय तिच्यावरच होत आहे. ह्या स्थितीत कुटूंब प्रमुख पुरता फसून जातो. त्याला ह्या सर्वांचे रक्षण, पालनपोषण आणि चांगले संबंध ठेवण्याची जबाबदारी पडलेली असते. जे लोक आर्थिक दृष्टया कमजोर असतात त्यांना तर अशा बिकट परिस्थितीत आपले जगणे अशक्य होऊन बसते. काही तर हे सर्वकाही सोडून पळून जाण्याची धमकी देतात. तर काही एक सोपा उपाय अवलंबतात. तो मार्ग म्हणजे ह्या दोन्ही बाजूपैकी एकाच बाजूचा साथ देत राहतात.

ही एक वस्तूस्थिती आहे की मनुष्य आपल्या जवळच्या स्थितीशी प्रभावित होतो. जेव्हा तो एका पक्षाच्या बाजूला झूकतो आणि दुसऱ्या

बाजूच्या लोकांशी बेपर्वा होतो. अशा प्रकारे तो कुटूंब प्रमुख जर आईवडिलांची, भाऊबहिणींची बाजू घेत असेल तर ह्याचा अर्थ असा होतो की सर्व चूक ही त्याच्या पत्नीचीच आहे. तर एखाद्या ठिकाणी असे चित्र दिसते की कुटूंब प्रमुख पत्नीचा गुलाम बनतो आणि आईवडील, भाऊ, बहिणीशी अन्याय व अत्याचार करतो.

दिव्य कुरआन आणि हदीस नुसार हे कुटूंब प्रमुखाचे आचरण चुकीचे आहे. अशावेळी बुध्दी व समझदारीने व्यवहार केला जाणे अपेक्षित आहे ज्यामुळे दोन्ही बांजूच्यावर अन्याय होणार नाही. एकाच बाजूच्या लोकांच्या कानाने ऐकणे, तोंडाने बोलणे आणि डोळ्याने पाहणे किंवा त्यांच्याच मनाने विचार करणे अयोग्य कृत्य आहे. न्यायनिष्ठ बनण्यासाठी ह्या बिकट स्थितीशी न घाबरता बुध्दी विवेकाने आणि समझदारीने काम घेणे आवश्यक आहे आणि अल्लाहजवळ प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी शक्ती व प्रेरणा प्राप्तीची याचना करावी. अल्लाहने तर मनुष्याला सर्वोत्तम निर्मिती बनविले आहे आणि त्याला बुध्दी विवेक आणि समझदारी दिली आहे. ह्या अल्लाहच्या देणगीचा वापर करणे म्हणजे अल्लाहची कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक प्रकार आहे. कुरआनमध्ये अल्लाहने लोकांना प्रत्यक्ष संबोधन करून आदेश दिला आहे की,

''काय तुम्ही बुध्दीविवेकाने काम करत नाही?''

अशा प्रकारे आपल्या देणग्यांचा उल्लेख करत अल्लाहने अनेक वेळा स्पष्ट केले आहे की,

''जेणे करून तुम्ही बुध्दी विवेकाने काम करावे.''

म्हणून बुध्दीविवेकपूर्ण कार्य हेच आहे की अल्लाहने इस्लामच्या रूपात परिपूर्ण जीवन पध्दती आम्हाला दिली आहे. त्याच्या हेतुंना आणि फायद्यांना आम्ही लक्षपूर्वक अभ्यासावे आणि चिंतन मनन करावे. हे लक्षात ठेवावे की जीवन धर्मात मनुष्याला अशक्यप्राय ईश आदेश दिले जात नाहीत. मानवी जीवनाला हसतखेळत यशस्वीरित्या जगण्यासाठी जर फक्त मूलबाळ आणि पत्नी यांचीच गरज असती तर अल्लाहने आईवडील नातेवाईक, शेजारी, मुस्लिम बंधुभगिनी आणि समस्त मानवजातीचे हक्कांना महत्व दिले नसते. जर मुलबाळे आणि पत्नीविना एक सत्य इस्लामी जीवन जगणे शक्य असते तर लग्न, पत्नीचा सांभाळ व गरजपूर्ती तसेच मुलबाळांचे संगोपन आणि उत्तम प्रशिक्षण यांना सदाचार म्हटले गेलेच नसते.

जे कोणी हे समजतात की बस आपली पत्नी आणि आपली मुलं हेच सर्वकाही आहे ह्यापुढे संबंध ठेवण्याची काहीच आवश्यकता नाही, तर ही मंडळी मनुष्यांना जणू काही चिमण्या, कावळे, गिधाडे इ. पशुंच्या पातळीवर आणून सोडतात. पशू, पक्षी आणि जनावरांसाठी हे शक्य आहे की आपल्या घरट्यानांच किंवा घोळक्यांनाच सर्वस्व समजून बसतात. अल्लाहने मुलबाळं, पत्नी, आईवडील, नातेवाईक, शेजारी, मुस्लिम बंधुभगिनी आणि समस्त मानवजातींचे हक्क निश्चित करून मनुष्याला स्पष्ट समजावून दिले की मानवी समाज इतर ईश निर्मितींच्या समाजापेक्षा विस्तृत आहे.

येथें एक बाब लक्षात ठेवली पाहिजे. एकीकडे मुलबाळं व पत्नी तर दुसरीकडे रक्ताचे नाते. हे दोन्ही भाग कुटूंब प्रमुखाचे शक्ती स्त्रोत आहेत. एक बुध्दी विवेकपूर्ण कुटूंब प्रमुख शक्तीच्या ह्या दोन्ही स्त्रोतांना नेहमी प्रवाहीत ठेवण्याचा प्रयत्न करीत राहील. कोणी मुलबाळं आणि पत्नीचेच होऊन जातात आणि दुसरे रक्ताचे नाते संबंध तोडून टाकतात. अशा शक्ती स्त्रोताचा एक भाग नष्ट होतो. अशांचे जीवन अपूर्ण राहते. म्हातारपणी त्यांच्या नशिबी मरणासन्न एकांतवास येतो. मुलबाळं मोठे झाल्यावर त्यांना सोडून दूर जातात जसे त्यांनी त्यांच्या तारुण्यात आपल्या आईवडीलांना आणि नातेसंबंधानासोडून दिले होते. अशा लोकांनी जर आपल्या शक्ती स्त्रोताच्या दुसऱ्या भागाला (आईवडील व नातेसंबंधा) सोडून दिले नसते तर त्यांना आज म्हातारपणी अनेक मार्गांनी सहानुभूती, मदत आणि सानिध्य लाभले असते. एकाकी जीवन जगण्याची वेळ त्यांच्यावर आली नसती. नादान आणि नालायक मुलं म्हातारपणी आईवडीलांकडे लक्ष देण्याला ह्या दोन्ही शक्ती स्त्रोतांच्या एकत्रीकरणाने बाध्य होतात.

तसेच इतरांच्या सांगण्यावरून प्रभावित होऊन आपल्या पत्नीवर अन्याय व अत्याचार करू लागतात. त्यांचे भविष्य सुध्दा अंधकारमय बनते. जेव्हा माणसं म्हातारपणाला पोहचतात तर त्यांच्या विरोधात अशावेळी एक वेगळी फळी घरात तयार होते. अशा लोकांना म्हातारपणी मुलबाळांचे प्रेम मिळू शकत नाही. ती आपल्या आईकडे जास्त झुकतात आणि दिवसेंदिवस आईचे वजन घरात वाढत जाते आणि पिता मूल्यहीन बनत जातो. वडील आईवर अन्याय व अत्याचार करतात अशावेळी मुलांच्या मनात वडीलाबद्दल तेड निर्माण होते. वडीलाच्या म्हातारपणी त्यांचे आईवडील मृत पावलेले असतात. भाऊ बहिणी

त्यांच्या जंजाळात मग्न असतात. आपल्या भावाच्याकडे दुरूनच ते सहानुभूती दाखवितात. पत्नी आणि मूलं ज्यांची मन आईवर केलेल्या अन्याय व अत्याचारामुळे दूर गेलेली असतात, ते वडीलांना संभाळणार नाहीत आणि सांभाळले तरी मनापासून संभाळणार नाही. अशावेळी दूसऱ्यांचे ऐकून पत्नीवर प्रारंभापासून अन्याय अत्याचार करणाऱ्याला म्हातारपणी मरणासन्न एकांतवास भोगावा लागतो. अशा वेळी त्याला दुसऱ्याची मदत जवळीक व स्नेह आवश्यक असते. हा खुलासा ह्यासाठी देण्यात आला आहे की एकीकडे मुलबाळं आणि पत्नी तर दुसरीकडे घरातील रक्ताच्या नाते संबंधीशी न्यायपूर्ण वागणूक ठेवणे अत्यावश्यक आहे. आणि मनुष्याने ह्याला तितकेच अत्यावश्यक समजावे जेवढे ते आवश्यक आहे. कारण मनुष्य जर एखाद्या बाबीला आवश्यक समजून बसतो तेव्हा तो त्यासाठी काहीही करू शकतो. अशा वेळी एकीकडे झुकून दुसरीकडे तो अन्याय अत्याचार करु लागतो.

येथे हे समजून घेणे आवश्यक आहे की न्यायपूर्ण व्यवहारासाठी जास्त आवश्यक वरील दोन गोष्टी आहे. म्हणजे एक कुटूंबातील सर्वांच्या हक्कांबाबत जाणून घेणे आणि त्यांना जबाबदारीने पार पाडण्यासाठी प्रयत्नशील राहाणे आवश्यक आहे. आणि दुसरी गोष्ट जी अत्यंत महत्वाची आहे ती म्हणजे त्यांच्या हक्कांविषयी परलोकात अल्लाहसमोर जाब द्यावा लागणार, हा परलोकध्यास करणे अत्यावश्यक आहे. घरातील कुटूंबप्रमुखाने हिमतीने एका बाजूच्या लोकांचे हक्क अदा करतांना दुसऱ्या बाजूच्या लोकांशी कधीही भीऊ नये. कारण कर्तव्य पार न पाडणे अथवा एखाद्याला त्याचा हक्क न देणे म्हणजे अल्लाहची नाराजी ओढवून घेणे आहे. अल्लाहच्या नाराजीपुढे इतर कुणाच्या ही नाराजीला काही महत्व नाही. ह्या विषयी खालील हदीस स्पष्ट उल्लेखनीय आहे.

''मदिना शहरींपैकी एकाचे निवेदन आहे की अमीर माविया (र) यांनी आदरणीय माता आयेशा (र.) यांना पत्र लिहून संक्षिप्त स्वरूपातील उपदेशासाठी विनंती केली. म्हणून आदरणीय माता आयेशा (र.) यांनी अमीरे माविया (र.) यांना पत्र लिहिले. अस्सलामुअलैकूम, अम्माबाद, निःसंशय मी प्रेषित (स.) यांना सांगताना ऐकले की ज्याने लोकांना नाराज करून अल्लाहला राजी केले. त्याला अल्लाह लोकांच्या त्रासापासून वाचविल. ज्याने अल्लाहला नाराज करून लोकांना खुश केले, अल्लाह त्याला त्याच लोकांच्या हवाली करील वस्सलामु अलैकूम.'' (तिरमिजी)

लोकांच्या हवाली करील म्हणजे अल्लाहची मदत अशा माणसाला मिळणार नाही आणि त्याला लोकांच्याच दयेवर सोडून देईल. लोक मग त्याच्याशी कसाही व्यवहार करोत.

न्यायपूर्ण व्यवहार करण्यासाठी दुसरी अत्यावश्यक गोष्ट आहे. की कुटूंब प्रमुख समजदार आणि हिम्मतदार असावा. त्याने एखाद्याच्या समोर त्याच्या सारखे बोलू नये. ह्यामुळे दोघात न्यायपूर्ण व्यवहार करणे त्याला अशक्य होत जाईल. काहीतर इतके नादान असतात की पत्नीसमोर आईवडील, भाऊ बहीणीं विषयी तक्रार सुरू करतात. आणि जेव्हा आईवडिलांशी जाऊन मिळाले की पत्नीविषयी तक्रार सुरु. अशा स्थितीत घरातील स्थिती आणखी बिघडु लागते आणि ह्या व्यक्तीला आणखी समस्यांना तोंड द्यावे लागते. त्याला तर दोन्ही बाजुला न्यायपूर्ण व्यवहार करणे आवश्यक होते. पत्नीशी प्रेम प्रकट करण्यासाठी आईवडीलांची तक्रार तिच्या पाशी करणे बेअकलीचे वर्तन आहे. आणि ह्यापेक्षा वाईट आईवडीलांना आपली आज्ञाधारकता दाखविण्यासाठी पत्नीची तक्रार त्यांच्याकडे करणे. एखाद्या अक्कलवान व समजदार माणसाला आपले प्रेम अथवा आज्ञाधारकता दुसऱ्या कुणाला दाखवयाची असल्यास उत्तम मार्ग त्यांच्याशी सदाचार करणे आहे. दुसऱ्या विषयी तक्रार आणि निंदा करणे मुळीच नाही.

तिसरे गुण त्या व्यक्तीमध्ये न्यायपूर्ण व्यवहार करण्यासाठी हिम्मत असणे आवश्यक आहे. तो एकासाठी दुसऱ्याचे हक्क मारणार नाही की त्याला त्रास देणार नाही. तो जर हिम्मतबाज असेल तर शेवटी घरातील सर्वजण त्याच्याशी सहमत होतात. मनुष्य स्वभाव आहे की ज्या मार्गाने त्याला यशप्राप्त होणार नाही त्या मार्गाला तो विसरून जातो. मनुष्य एखादी इच्छा मनात बाळगून असतो. परंतु ती इच्छा पूर्ण होत नाही तेव्हा तो नाराज होतो आणि कालांतराने त्या अपूर्ण इच्छेला मनातून काढून टाकतो. म्हणून कुटूंब प्रमुखाला धैर्याने अल्लाहला संतुष्ट करण्यासाठी ह्याविषयी धैर्याने मार्ग काढावा लागतो. कालांतराने नाराज झाले ली बाजू आपली नाराजी सोडून त्याला मदतीचा हात पुढे करते. अशा प्रकारे कुटूंबात सौहार्दाचे, एकीचे वातावरण तयार होऊन त्या व्यक्तीला काम करणे सोपे जाते. जर ती व्यक्ती कच्च्या कानाची आणि डरपोक असेल तर घरातील प्रत्येक जण त्याला आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न करील व त्याचे कान भरत राहतील. चालाख व्यक्ती त्याला आपल्या हाताखालचा बनवून ठेवील. अशा स्थितीत त्याला दुसऱ्याशी न्यायपूर्ण व्यवहार करणे अशक्य होऊन बसते. अशा डरपोक माणसाशी न्यायपूर्ण व्यवहाराची काय अपेक्षा ठेवावी?

कुटूबांतील लोकांमध्ये एकोप्याने राहण्यासाठीचे वातावरण बनविण्यासाठी आवश्यक आहे की तक्रार करणाऱ्याची तक्रार समोर ऐकली जावी ज्याच्या विषयी तक्रार केली जात आहे. ह्यामुळे संघर्ष कमी होण्याला मदत होते. एका स्त्रीने सांगितले की मी माझ्या मोठ्या जावे विषयी माझ्या पतीशी तक्रार केली पती काही न बोलता उठून गेले. थोड्या वेळानंतर त्यांनी वहिनीला बरोबर आणले व म्हणाले ''फरीदा, आता तुझी वहिणी विषयी काय तक्रार आहे ते बोल.'' ती अवाक राहीली एकदा चूक झाली त्यानंतर तीने पतीकडे कधीच तक्रार केली नाही. तिने सांगितले की घरात ह्याच कारणाने शांती नांदत आहे. एकमेकाला एकमेकासमोरच तक्रार करण्याचा अधिकार आहे. ह्यामुळे कधीतरी घरात एक दुसऱ्याची तक्रार त्याच्याच समोर करतात. ह्यामुळे दोषारोप, निंदानास्तीला थारा नसतो.

एखाद्याला दुसऱ्याविषयी कुणाचे तरी कान भरावयाचे असतील तर तो मीठमसाला लावून व फुगवून आपल्या शैलीत सांगतो. अशा वेळी आपली चुक झाकली जाईल व समोरच्याची चूक ठळकपणे दिसेल अशा प्रकारे तो वर्णन करतो. ज्याच्यामुळे तक्रार केली जात आहे तो जर समझदार व बुध्दीमान नसेल तर तो ह्याच्या वर्णनावरून निर्णयाप्रत पोहचतो. परंतु तक्रार करतांना ती व्यक्ती सुध्दा उपस्थित असेल तर तो समोरच्याची चुक सुध्दा दाखवितो. अशा वेळी पूर्ण प्रकरण समोर येते व निर्णय घेणाऱ्याला न्यायपूर्ण निर्णय देणे सोपे जाते. अशा वेळी तक्रार करणारा खजील होतो आणि तो ही चूक पुन्हा पुन्हा करणे बंद करतो.

पत्नीशी अन्याय करण्याचे इतर प्रकार

हे स्पष्ट आहे की पत्नीशी अन्याय व अत्याचार करण्याचा प्रकार दुसऱ्याचे ऐकून तिला त्रास देणे आहे. तसेच पती आपल्या संशयी वृत्तीने सुध्दा पत्नीवर अनेकदा अत्याचार करतो. तसेच पत्नीच्या सगेसंबंधी लोकांशी वितुष्ट आल्यानंतर पत्नीला त्रास देणे सुरू होते. अशावेळी ते आपल्या माननीय पूर्वजांचे वर्तनाला विसरून जातात.

माननीय अबू हुरैरा (र.) निवेदन करतात की प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे की,

"मुस्लिमामध्ये सर्वात श्रेष्ठ इमानधारक तो आहे ज्याचे आचरण सर्वात्कृष्ठ आहे. आणि तुमच्यात सवपिक्षा अधिक चांगला तो आहे जो आपल्या पत्नीसाठी चांगला आहे." (तिरमिजी)

असे लोक ह्या ईश आदेशाकडे सुध्दा दुर्लक्ष करतात की ज्याचा कुरआन मध्ये स्पष्ट उल्लेख आहे,

"त्यांच्याशी (पत्नींशी) चांगल्या पध्दतीने जीवन जगा."

(सूरेनिसा, आयत १९)

आणि असे लोक ह्या ईश आदेशाला सुध्दा विसरून जातात ज्याचा कुरआन स्पष्ट उल्लेख करीत आहे,

"स्त्रियांसाठी सुध्दा चांगल्या पध्दतीप्रमाणे तसेच हक्क आहेत जसे पुरुषांचे हक्क त्यांच्यावर आहेत." (सुरे बकरा, आयत २२७)

काही पती तर असे संशयी वृत्तीचे असतात की पत्नीला व्यवस्थित राहु देत नाही की चांगला पोशाख करु देत नाहीत. त्यांच्यार नियमित अत्याचार करतात आणि आयुष्यभर त्यांना जखडून ठेवतात. कायदेशीररित्या त्यांना स्वतंत्र करीत नाहीत जेव्हा की अल्लाहचा ह्या विषयी स्पष्ट आदेश आहे,

"फक्त त्रास देण्यासाठी त्यांना (पत्नी) थांबवून (अडकवून) ठेवू नका, हा अत्याचार आहे आणि जो असे करील तर तो वास्तविकपणे स्वत:वरच अत्याचार करील." (सुरे बकरा)

आपल्या पत्नीशी अन्याय करण्याचे अनेक प्रकार आहेत. परंतु त्यांच्यापैकी सर्वात वाईट प्रकार म्हणजे एकापेक्षा जास्त पत्नी असल्यावर फक्त एकीच्या कडेच जास्त झुकाव असणे आहे. अशा स्थितीत दुसऱ्या पत्नींकडे दुर्लक्ष केले जाते. हा एक मोठा अन्याय आहे. इस्लामने ह्या विषयी प्रखर टिका केली आहे आणि अल्लाहने कुरआन मध्ये स्पष्ट आदेश दिला आहे की सर्व पत्नींशी एक सारखा चांगला व्यवहार करावा आणि सर्व पत्नींना समपातळीवर ठेवले जावे. मनावर माणसाचा ताबा नसतो त्यामुळे त्याला एका पत्नीकडे दुसरी पेक्षा जास्त ओढ असते अशा वेळी हा अपवाद समजला जातो. परंतु बाह्य आचरणात मात्र पतीला दुसऱ्या पत्नीला पहिल्या पत्नीसारखेच वागवावे लागेल. अन्यथा असा पती अत्याचारी व अन्यायी ठरेल.

माननीय अबु हुरैरा (र.) कथन करतात की प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे की,

''ज्या पतीला दोन पत्नीं असतील आणि तो दोघींपैकी एकीकडे जास्त झुकतो आणि दुसरीकडे दुर्लक्ष करतो. एकीचे हक्क अदा करतो आणि दुसरीचे करत नाही. तर कयामतच्या दिवशी ती व्यक्ती निम्म्या शरीराची बनून सर्वासमोर येईल.'' (अबु दाऊद)

वरील हदीसवरून हेच सिध्द होते की प्रेषित (स.) आपल्या पत्नींशी न्यायपूर्ण व्यवहार करत होते. प्रेषित (स.) प्रत्येक पत्नीकडे जात असत. जेव्हा प्रेषित (स.) यांनी जगाचा निरोप घेतला त्या शेवटच्या काळात ते आदरणीय माता आयशा (र.) यांच्या घरी राहीले होते. परंतु असे करतांना त्यांनी इतर पत्नींशी तशी परवानगी मागितली होती आणि ती परवानगी त्यांना मिळाली होती.

घरातील प्रमुख स्त्रीची जबाबदारी

येथे हे स्पष्ट केले पाहिजे की घरात न्यायाचे आणि शांतीचे वातावरण ठेवण्याची जबाबदारी फक्त एकट्या कुटूंब प्रमुखाचीच नाही तर घरातील प्रमुख स्त्रीची सुध्दा ती जबाबदारी आहे. उपजीविका कमविण्यासाठी पुरुष फार काळ बाहेरच असतो. त्या काळात घरातील व्यवस्थापन त्या प्रमुख स्त्रीला पहावे लागते. तसेच पुरुष घरात असल्यानंतर सुध्दा अनेक कामे त्या स्त्रीला करावी लागतात. ती ह्या जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाही. तिला न्यायपूर्ण व्यवहार हा करावाच लागतो. घरातील लहान मुलं, येणारी जाणारी माणसं, पाहुणे तसेच पतीचे मित्रमंडळी यांच्याशी तिला न्यायपूर्ण व्यवहार ठेवावा लागतो.

न्यायपूर्ण व्यवहार करण्यासाठी सत्ता आवश्यक आहे. काही ठिकाणी घरमालकीणीला जास्त अधिकार असतात आणि प्रमुखाला फार कमी व्यवहार पहावे लागतात. अशा घरात घरमालकीणीकडे घरात न्यायपूर्ण व्यवहार करण्याची जास्त जबाबदारी येते. परंतु जिथे कुटूंब प्रमुख पुरुषाकडेच घरातील न्यायपूर्ण व्यवहाराची जबाबदारी असते तिथे फार कमी जबाबदारी घरमालकिणीकडे असते.

काही कुटूंब अशीही असतात जिथे कमवती मुलं असतात. परंतु घरातील सर्व सत्ता आईकडे असते. अशा स्थितीत त्या आईवर संपूर्ण घराची

जबाबदारी येते की तिने सूनेसह सर्वांशी न्यायपूर्ण व्यवहार करावा. आणि ज्या घराची व्यवस्था कमवत्या मुलाच्या पत्नीकडे असते अशा वेळी तिला सासू सासरे, भावजया व इतर सर्वांशी न्यायपूर्ण व्यवहार करावा लागतो.

थोडक्यात म्हणजे जिथे अन्याय करण्याचा अधिकार असेल तिथे ही जबाबदारी सुध्दा येते की अन्यायपूर्ण व्यवहार करून जगातील अपमान आणि परलोकातील शिक्षेला पात्र होण्याऐवजी न्यायपूर्ण व्यवहार करून दोन्ही जगातील यशप्राप्तीची काळजी घ्यावी.

तसे तर प्रत्येक मनुष्याला काहीना काही अधिकार प्राप्त असतो. म्हणून म्हणावे लागते की प्रत्येक जण ह्या धोक्यात गुरफटलेला आहे. मनुष्य आपल्या अधिकार क्षेत्रात मग ते कितीही लहान का असेनात, जर अन्याय पूर्ण व्यवहार करील तर त्याची हानि त्यालाच पोहचणार. स्वतः ला ह्या हानीपासून सुरक्षित ठेवणेच मोठे यश आहे.

घरमालकीणीची सर्वात मोठी परीक्षा असते जेव्हा तिच्या घरात सावत्र मुलं असतात. त्या सावत्र मुलांशी तिला न्यायपूर्ण व्यवहार करणे आवश्यक आहे. स्त्री आपल्या मुलांशी जितकी प्रेमळ असते तितकीच ती सावत्र मुलांसाठी कठोर मनाची असते. ही मुलं सावत्र आईच्या दये व कृपेवरच असतात. अशा स्थितीत ती सावत्र आई आपल्या नमाज आणि रोजे व इतर उपासनांबरोबर ह्या सावत्र मुलांबरोबर अन्याय व अत्याचार करीत राहीली तर ती जगात अपमानित होणारच परंतु परलोकातील शाश्वत शिक्षेला सुध्दा पात्र ठरणारच. ज्या मुलांविषयी मनात ममता नसेल त्यांच्याशी न्यायपूर्ण व्यवहार करणे कठीण काम जरी असले तरी अशक्य काम नाही. आवश्यकता फक्त ह्याची आहे की जीवनाला त्याच दृष्टीने पाहिले जावे ज्या दृष्टीने अल्लाह आणि त्याचे प्रेषित यांनी पाहावयास शिकविले आहे. त्या वास्तविकतेला दृष्टिसमोर ठेवले जावे. जे आंधळे पाहु शकत नाहीत. परंतु ज्यांना इस्लामरूपी जीवन पध्दतीचे ज्ञान आहे त्यांना ती वास्तविकता प्रकाशमय सिध्द होते. अल्लाह आणि अल्लाहचे प्रेषित (स.) यांनी मनुष्यासाठी हेच पसंत केले आहे की जीवनात त्याच्या दृष्टीसमोर नेहमीच परलोक सफलता असणे आवश्यक आहे. इस्लामी जीवन व्यवस्थेचे ज्ञान असणाऱ्यांना परलोकध्यास सतत राहातो. जशी करणी तशी

भरणी ह्या न्यायाने ह्याच जगात फेडावे लागते आणि मरणोत्तर जीवनात तर शाश्वत शिक्षा आहेच. म्हणून जगातील आपल्या जीवन रूपी शेतीत चांगले बी पेरावे म्हणजे परलोकात मिळणारे फळ चांगलेच असेल.

आता जी स्त्री आपल्या जीवनाच्या शेतीत अन्यायाचे व अत्याचारांचे बी पेरील तर ती परलोकात सुखसमृध्दी शांतीमय व संतुष्ट असे फायद्याचे पीक कसे घेणार? अत्याचाराचे व अन्यायाचे बी तर नुकसानीचे आणि कष्टप्रद पीकच देणार. म्हणुन जी आई खाण्यापिण्यात, कपडेलत्ते, शिक्षण, लग्न तसेच जीवनाच्या इतर व्यवहारात सख्खे आणि सावत्र मुलांमध्ये अंतर ठेवते, आपल्या मुलांना तर ऐशोआरामात संगोपण करते आणि त्यांच्या उज्वल भविष्यासाठी प्रयत्नरत राहाते. परंतु सावत्र मुलांसाठी मात्र कष्टमय जीवन आणि त्यांच्या शिक्षणावर व चांगल्या संगोपणावर कमी खर्च करते. सावत्र आई विसरून जाते की त्या सर्व मुलांना समान हक्क त्यांच्या पित्याच्या कमाईत आहे. जी मुले आईला दूरावली ती मुलं वडीलांच्या ह्या हक्कांशी कशी दुरावतील? आता घरमालकीणीच्या अधिकारात त्या सावत्र मुलांना आपल्या हक्कांपासून वंचित ठेवत आहे तर ह्याचे पाप त्या घरमालकीण आईला आणि मुलांच्या बेपर्वा वडीलांच्या पदरात पडते. कारण हा बाप हे पाहण्याचे कष्ट सुध्दा घेत नव्हता की सावत्र आई मुलांना त्यांचा हक्क देते की नाही. ह्या सावत्र आईला काय माहित की ह्या विना आईच्या मुलांवर तिने केलेला अन्याय कोणत्या स्वरुपात तिला भोगावा लागेल. तिची स्वतःची मूलं सुध्दा कष्टमय जीवन जगण्यास बाध्य होऊ शकतात. वडीलाच्या मालमत्तेतील सावत्र मुलांचा हक्क ती घरमालकीन सावत्र आई हिसकावून घेते व आपल्या स्वतःच्या मुलांच्या नावे करते. तिला काय माहित की हा हरामाचा माल तिला तिच्या वैध माला सोबत घेऊन डुबेल?

स्वतःच्या मुलांविषयीच्या भावना व सावत्र मुलांविषयीच्या भावना ह्यात निश्चितच फरक आहे. भावनात्मक पातळीवर अल्लाहने कोणत्याच आईला विवश केलेले नाही. परंतु व्यावहारिक पातळीवर मात्र अन्यायपूर्ण व्यवहाराला अमान्य केले आहे. ज्या आईला इस्लाम रूपी परिपूर्ण जीवन व्यवस्थेचे ज्ञान असते आणि परलोकध्यास त्या सोबत राहातो तर अशी माई दुसऱ्यांच्या हक्कांना कधीही पायदळी तुडवणार नाही. अशा ईशपरायण

मातेकडून त्याच्या पोटच्या मुलांपेक्षा जास्त काळजी सावत्र मुलांची वाहिली जाते. अशा न्यायी मातेला अल्लाह मोबदला देतो. शक्य आहे की त्या मोबदल्यांपैकी एक तिच्या पोटच्या मुलांना अल्लाह ह्या जगाच्या जीवनात सुध्दा यशस्वी करतो आणि परलोक जीवन सुध्दा सफल करतो.

ही अत्यंत दु:खाची गोष्ट आहे की असंख्य पुरुष आपल्या ईशपरायण पत्नीला अशा मार्गावर चालण्यास मजबूर करतात ज्या मार्गावर चालण्यासाठी त्यांचे मन तयार होत नाही. दुसरीकडे अशा अनेक स्त्रिया आहेत ज्या आपल्या पतींना हलाल रोजी पेक्षा जास्त कमावण्यासाठी हरामची कमाई घेण्यास मजबूर करतात. आणि न्यायपूर्ण व्यवहार करणाऱ्या पतींना अन्यायपूर्ण व्यवहार करण्यास बाध्य करतात. हे कृत्य मुस्लिम स्त्री चे कृत्य असूच शकत नाही. जगाच्या फालतु व अशाश्वत फायद्यापोटी आणि द्वेषापोटी आपल्या पतीला अन्याय व अत्याचाराच्या मार्गावर चालण्यास बाध्य करणारी स्त्री मुस्लिम कशी असू शकते? मुस्लिम स्त्री पासून तर ही अपेक्षा आहे की पती जर अन्याय व अत्याचारी मार्गावर चालत असेल तर त्याला इस्लामी जीवन पध्दतीवर चालण्यास प्रोत्साहित ती करते जेणेकरून त्यांना लौकिक आणि पारलौकिक दोन्ही जीवनात यश प्राप्ती व्हावी.

मुलांमध्ये न्याय करणे

माननीय नोमान बीन बशरी (र.) निवेदन करतात की प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे की "हे लोकांनो, आपल्या संतती दरम्यान न्याय करा, आपल्या संतती दरम्यान न्याय करा." (निसाई)

असे आहे की मुलांविषयी पिता अन्याय कसा करेल? परंतु वस्तुस्थिती आहे की संततीच्या दरम्यान सुध्दा अन्याय होऊ शकतो आणि त्याचे वेगवेगळी रूपे असतात. कधी संतती एकापेक्षा जास्त आईपासून असतात. अशा वेळी ज्या पत्नीकडे पित्याचा जास्त झुकाव असतो तिच्या मुलांना तो जास्त प्रेम करतो. आणि दुसऱ्या मुलांकडे दुर्लक्ष करतो. बिना आईच्या मुलांकडे (मृतपत्नीची मुले) दुर्लक्ष आणि जिवंत (हयात) पत्नीच्या मुलांचा लाड होतो. अशा परिस्थितीत पित्याला पहिल्या पत्नीच्या मुलांमध्ये दोष सुध्दा दिसू

लागतात. आणि तो आपल्या अन्यायी कृत्यांना योग्य समजू लागतो. ज्या मुलांची आई जीवंत आहे ती सुध्दा खोडसाळपणा करतातच परंतु त्यांची आई त्यावर पांघरुण घालते. उघडे पाडतात ती बिना आईची मुले ! बापाला वाटते हीचं मुले बदमाश आहेत आणि दुसरी मुलं सभ्य आणि चांगली.

अशा प्रकारे काही कुटूंबात मुल आणि मुलींच्या मध्ये अंतर ठेवले जाते आणि मुलाचे हक्क तर आनंदाने पूरे केले जातात परंतु मुलींना मात्र ओझे समजले जाते. असे अपप्रवृत्त लोक प्रेषित (स.) यांची शिकवण विसरले आहेत. काय त्यांना हे माहित नाही किंवा जाणीव पूर्वक ते असे करतात?

माननीय इब्ने अब्बास (र.) निवेदन करतात की प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे की "ज्या व्यक्तीची मुलगी आहे तो तिला जीवंत गाडत नाही की तिला ओझे समजत नाही आणि आपल्या मुलाला तिच्यावर प्राधान्य देत नाही तर अल्लाह त्याला स्वर्गात दाखल करील." (अबू दाऊद)

माननीय अबू सईद खुदरी (र.) निवेदन करतात की प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे की "ज्याने तीन मुलींची देखभाल केली व संगोपण केले आणि नंतर त्यांना चांगले शिक्षण प्रशिक्षण दिले व त्यांचे लग्न केले आणि त्यांच्याशी चांगला व्यवहार केला तर त्याच्यासाठी स्वर्ग आहे." (अबू दाऊद)

माननीय उक्बा बिन आमिर (र.) निवेदन करतात की प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे की, "ज्या माणसाच्या तीन मुली आहेत आणि तो त्यांच्या मामल्यात संयमाने वागत असेल आणि आपल्या उत्पन्नातून त्यांना खाऊ घातले, पोषाख केला तर त्या मुली कयामतच्या दिवशी त्याला अग्नीपासून वाचविण्याचे साधन ठरतील." (इब्ने माजा)

अत्यंत खेदाची गोष्ट आहे की अनेक कुटूंबात मुलीच्या हक्कांकडे लक्ष देण्याची गरज भासतच नाही ज्यांना इस्लामी जीवन व्यवस्थेने निश्चित केलेले आहेत. विशेषतः मालमत्तेत मुलीला हिस्सा मिळणार नाही याकडे लक्ष दिले जाते कारण कुटूंबाची संपत्ती दुसऱ्या कुटूंबात जाऊ नये. कुरआनमध्ये अल्लाहने मुलीच्या वारसा हक्कासंबंधी स्पष्ट आदेश दिलेले आहेत की,

"पुरुषांसाठी त्या संपत्तीत हिस्सा आहे जी आईवडील आणि जवळच्या

नातेवाईकांनी सोडले आहे. आणि स्त्रियांसाठी सुध्दा त्या संपत्तीत हिस्सा आहे. जे आईवडील आणि जवळच्या नातेवाईकांनी सोडले आहे मग ते जास्त असो की कमी आणि हा वाटा अल्लाहकडून निश्चित केला गेला आहे.''

दुसऱ्या ठिकाणी कुरआन मध्ये स्पष्ट आदेश आहे की,

''तुमच्या संतती विषयी अल्लाह तुमचे मार्गदर्शन करीत आहे की पुरुषाचा वाटा दोन स्त्रियां बरोबरीचा आहे. जर मृताचे वारस दोन पेक्षा जास्त मुली आहेत तर त्यांना मुलांच्या २/३ दिले जावे आणि एकच मुलगी आहे तर मुलाचा अर्धा हिस्सा तिचा आहे.'' (सुरे निसा आ. नं. ११)

ह्या वरील कुरआनोक्ती वरुन मुलीचा मृताचा वारसातील हिस्सा निश्चित आहे. एक मुलीला संपत्तीचा भावांपेक्षा निम्मा हिस्सा देणे न्यायपूर्ण आहे. कारण मुलांच्या खांद्यावर दुसऱ्यांची जबाबदारी असते तशी मुलीवर नसते. म्हणून न्यायपूर्ण हेच आहे की मुलाच्या हिस्स्याच्या निम्मा वाटा मुलीचा आहे म्हणजे ज्याची जास्त जबाबदारी त्याला जास्त वाटा दिला जावा.

म्हणून आईवडीलांना हाच आदेश दिला की सर्व मुलांबरोबर न्यायपूर्ण व्यवहार करावा. ह्या आदेशाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे आईवडीलांच्या आचरणाला हानि पोहचविणे आहे. माननीय नोमान बीन बशीर (र.) सांगतात की ''माझे वडील माननीय बशीर (र.) यांनी आपल्या संपत्तीतून काही हिस्सा माझ्या नावावर केला. त्यावर माझ्या आईने (उमराह (र.)) यांनी नाराजी व्यक्त केली आणि सांगितले की जो पर्यंत प्रेषित (स.) यांना आपण ह्या विषयी साक्षी बनवत नाही तो पर्यंत मी हे स्वीकारणार नाही. ''माझे पिता प्रेषित (स.) यांच्या हुजूरात पोहचले जेणे करून याविषयी त्यांची साक्ष घ्यावी. प्रेषित (स.) यांनी विचारले, ''काय तुम्ही ह्या प्रकारे तुमच्या सर्व मुलींना दिले आहे?'' वडीलांनी नकारात्मक उत्तर दिले. यावर प्रेषित (स.) यांनी आदेश दिला की ''अल्लाहच्या कोपचें भय बाळगा आणि आपल्या संततीमध्ये न्यायपूर्ण व्यवहार करा.'' माझे पिता परत आले आणि आपले वाटप परत घेतले. (मुस्लिम)

मुस्लिम ह्या हदीस संग्रहातच दुसऱ्या ठिकाणी हाच प्रसंग कथन केला गेला आहे आणि त्याच्या शेवटी खालील मजकूर आलेला आहे.

प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे की ''हे बशीर (र.) काय ह्यापेक्षा तुझे आणखीन मुलं आहेत?'' त्यांनी होकारार्थी उत्तर दिले. प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे की ''काय सर्वांना वाटप सारखे सारखे केले आहे?'' त्यांनी नकारात्मक उत्तर दिले. त्यावर प्रेषित (स.) यांनी सांगितले की ''मला साक्ष बनवू नकोस, कारण मी अत्याचारावर ग्वाही देत नाही.'' (मुस्लिम)

मुलांमध्ये न्यायपूर्ण व्यवहार न करण्याचा दुष्परिणाम तर एक हा होतो की मुलांमध्ये एकोपा राहात नाही. मुलं अशा स्थितीत एक दिलानं राहात नाहीत. ज्या भावडांना वंचित ठेवले जाते त्यांच्या मनात त्या लाडक्या भावडांविषयी द्वेष भावना निर्माण होते कारण त्यांना त्यांचे हक्क जास्तच दिले जातात. वंचित मुलं पुढे ह्या लाडक्या भावडांना पाण्यात पाहू लागतात. भेदाभेद करणाऱ्या आईवडीलांविषयी त्यांच्या मनात आदरभाव राहात नाही. अशा प्रकारे अन्याय करून आईवडील एकीकडे अल्लाहची नाराजी प्राप्त करतात तर दुसरीकडे जगात त्यांना हानि पोहचते ती वेगळीच. म्हणून आईवडीलांची धार्मिकताच नव्हे तर बुध्दीमत्ता आणि समजदारी ही आहे की त्यांनी संतती दरम्यान न्यायपूर्ण व्यवहार करावा भेदभाव करू नये. शेवटी ही गोष्ट मनात ठेवली पाहिजे की एखाद्या समाजाची संपत्ती काही कुटूंबातच एकत्र होत असेल तर त्यामुळे समाजात अव्यवस्था आणि बेचैनी निर्माण होते. संपत्तीला समाजात प्रवाहित होणे आवश्यक आहे जेणे करून बऱ्याचशा कुटूंबात ती फैलावत जाईल.

अल्लाहने व्याजाला हराम आणि जकातला अनिवार्य केले आहे. दान धर्माला पुण्य आणि वारसा हक्काला आवश्यक ठरविले आहे. संपत्ती थोड्याच हातात एकत्रित होण्याऐवजी अनेक हातात ती पोहचली पाहिजे. एक व्यक्ती जेव्हा जकात देतो, जेव्हा त्यांची वारस संपत्ती वाटली जाते तेव्हा ती संपत्ती जी एका घरात होती ती अनेक घरात टुकडे टुकडे होऊन फैलावत जाते. वारसा संपत्ती जेव्हा मुलींना वाटप होते तर एकापेक्षा अनेक कुटूंबात संपत्ती वितरण होते. म्हणून जे लोक मुलींना संपत्तीत वाटा देत नाहीत ते एकीकडे अल्लाहच्या आदेशाची अवज्ञा करतात आणि दुसरीकडे समाजाचे नुकसान करतात ज्या समाजाचा ते एक अविभाज्य भाग असतात.

प्रकरण ३ रे

सामुदायिक जीवनात न्याय

मागील प्रकरणात आपण त्या न्यायाचा विचार केला ज्यास कुटूंबात प्रस्थापित केले जाते परंतु ह्याचा अर्थ असा होत नाही की न्याय फक्त घरापुरताच असतो. समाजजीवन शांतीपूर्ण आणि स्वास्थपूर्ण राहण्यासाठी समाजातील प्रत्येक क्षेत्रात न्याय प्रस्थापित होणे गरजेचे आहे. ह्या प्रकरणात आपण त्यांचा थोडक्यात विचार करुया. एखादा व्यक्ती श्रीमंत असो की गरीब त्याला जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी व्यापारी वर्गाशी संबंध ठेवावाच लागतो. हा व्यापारी वर्ग लोकांकडून पूर्ण किमंत वसूल करून माल कमी प्रमाणात अथवा निकृष्ठ दर्जाचा देऊ लागले तर हा स्पष्ट अन्याय आहे. ह्यामुळे पुर्ण समाजजीवन दु:खी बनते म्हणून त्यांना आदेश दिला आहे की,

"आणि मोजमाप करतांना पूर्ण न्याय करा." (सूरे अन्आम १५६)

तसेच दुसऱ्या ठिकाणी आदेश दिला गेला आहे की,

"आणि न्यायपूर्णतेने ठीक ठीक वजनमाप करा आणि मापात दांडी मारू नका." (सूरे अर् रहमान :९)

लहान लहान भांडणतंट्यापासून मोठमोठ्या न्यायालयीन दाव्यापर्यंतचे निर्णय घेतांना साक्ष देण्याची वेळ येते. अशा वेळी साक्ष देतांना लोकांना सावधान करताना आदेश दिला आहे की,

"हे लोकांनो, ज्यांनी ईमान धारण केले आहे अल्लाहसाठी सत्यावर अटल राहणारे बना आणि न्यायासाठी साक्ष देणारे बना." (सूरे मायदा : ८)

तसेच समाजात लोक ठराविक काळापूर्ते कर्जाचा व्यवहार करतात. अशा वेळी लोकांना सचेत करण्यात आले आहे की कर्जाच्या व्यवहार लेखी स्वरुपात करावा. अशासाठी दिव्य कुरआनात लोकांसाठी आदेश आला आहे,

"तुमच्या दरम्यान एक लिहिणाऱ्याने (दस्ताऐवज लिहिणारा) न्यायनिष्ठेने लिहावे." (सूरे बकरा : २८६)

श्रध्दावंतांना आदेश देण्यात आला आहे की जर दोन मुस्लिम (श्रध्दावंत) समुदाय आपसात लढतांना त्यांच्यात समेट घडून आणणे

आवश्यक आहे. त्यांच्यापैकी एक पक्ष दुसऱ्यावर अतिरेक करत असेल तर त्यांच्याशी लढावे जो पर्यंत ते अल्लाहचा आदेश पाळण्यास बाध्य होत नाही. जेव्हा दुसरा पक्ष (अन्याय करणारा) न्यायानिष्ठ बनून राहिला तर,

"मग त्यांच्या दरम्यान न्यायपूर्ण समेट घडवून आणावा आणि न्याय प्रस्थापित करा कारण अल्लाह न्याय करणाऱ्यांशी प्रेम करतो."

न्यायपूर्ण समेट करण्याचा आदेश ह्यासाठी दिला गेला आहे की जर समेट घडवितांना न्यायाचा विचार केला नाही तर एखाद्या पक्षावर अन्याय होणे साहजिक आहे. त्यांच्यावर अन्याय करून बळजबरीने त्यांना समेट घडविण्यास बाध्य केले जाते. असा बळजबरीचा समेट जास्त काळ टिकत नाही. ज्यांच्यावर अन्याय झाला ते समेटाला जास्त दिवस टिकू देत नाहीत. जो पक्ष दुसऱ्यावर अन्याय करून आपला फायदा करून घेतो तो दुसऱ्यावर जास्त अन्याय करू लागतो. परिणामतः समाज जीवनात जास्त अस्वस्थता वाढते आणि परिस्थिती दिवसेंदिवस जास्तच खराब होत जाते. वादादित मुद्यावर दोन भली सत् प्रवृत्तीची माणसं पुढे येऊन त्यांनी निर्णय द्यावा. कुरआन आदेश आहे की,

"ह्यांचा निर्णय तुमच्यापैकी दोन सत् प्रवृत्त व्यक्तींनी करावा."

ज्या स्त्रियांना तलाक दिला आहे आणि त्यांनी "इद्दत" ची मुद्दत पूर्ण केली तर त्यांच्या बाबतीत पुरुषांना आदेश दिला आहे की चांगुलपणाने त्यांच्याशी समेट घडून आणावा अथवा त्यांना चांगल्या रीतीने त्यांच्याशी दूर व्हावे. ह्यासाठी सुध्दा वरील प्रमाणेच आदेश आला आहे. कुरआन स्पष्टोक्ती आहे की,

"आणि दोन अशा माणसांना साक्षीदार बनवा जे तुमच्यापैकी न्यायनिष्ठ आहेत." (अत्‌तलाक : २)

अशा प्रकारे अल्लाहने स्पष्ट केले आहे की,

"आम्ही आमच्या प्रेषितांना स्पष्ट संकेत आणि मार्गदर्शनासह पाठविले आहे आणि त्यांच्या बरोबर ग्रंथ आणि तुळा अवतरित केले जेणे करून लोक न्यायनिष्ठ बनावेत." (अलहदीद : २५)

दिव्य कुरआन आणि हदीस मध्ये ज्या ज्या ठिकाणी न्यायाचा उल्लेख आला आहे त्या सर्वांना येथे नमूद करणे अशक्य आहे.येथे आपण समाजातील दोन महत्वाच्या संस्थांचा ह्या संदर्भात विचार करुया ज्यांच्यामुळे न्यायावर टिकून राहाणे व न्यायापासून दूर जाणे ह्या दोन्ही गोष्टी समाज जीवनासाठी परिणामकारकरित्या प्रभावी ठरतात. एक शासनकर्ते आणि दुसरे न्यायासनावर बसून न्याय देणारे आहेत.

शासन न्याय

राज्यकर्त्यांच्या हातात सत्ता असते. शासनव्यवस्थेमध्ये शासनकर्ते, राज्यकर्ते, पदाधिकारी ह्या सर्वांचाच समावेश होतो. सत्ता कमीजास्त प्रमाणात असणे म्हणजे कमी जास्त प्रमाणात न्याय व अन्याय करण्याची क्षमता असते. अशा प्रकारे ज्यांच्या जवळ सत्ता जास्त प्रमाणात एकवटलेली आहे ते जास्त प्रमाणात परीक्षेला सामोरे जातात. हातात एकवटलेल्या अमाप सत्तेमुळे दुसऱ्यांवर अन्याय, अत्याचार करून असे लोक अल्लाहच्या नजरेत पापी व अपराधी बनतात. शासनकर्त्यांनी प्रजेच्या इज्जतीचे, प्राणाचे आणि संपत्तीचे संरक्षण करण्यात दिरंगाई करणे घोर अन्याय आहे. त्यांच्या हातात जनता सत्ता ह्याचसाठी सुपुर्द करते की त्यांनी जनसेवा करावी आणि जनतेचे संरक्षण करावे. त्यांचे जीव, वित्त व इज्जतीचे रक्षण करणे शासनाधिशांचे आद्य कर्तव्य आहे. राज्यकर्ते सत्ताधीश तर चपळाईने बनतात आणि शासन सत्तेचा उपभोग स्वतःसाठी तत्परतेने करून घेतात परंतु जनतेची सेवा आणि त्यांचे रक्षण करण्यात मागे राहतात. अशी राज्यकर्ते मंडळी प्रथम श्रेणीचे अन्यायी आहेत. जेव्हा कोणावर अन्याय होत असेल तर शासनकर्त्यांनी त्याची बाजू घ्यावी. अन्याय ग्रस्ताला त्याचा हक्क बहाल केला जावा आणि अत्याचारीला शिक्षा दिली जावी. राज्य व्यवस्था अशी चोख ठेवली जावी की कुणालाही कुणावर अन्याय करण्याची संधीच उपलब्ध होऊ नये. जे शासनकर्ते शासन व्यवस्था चोख न ठेवता अव्यवस्था माजविण्यासाठी कारणीभूत ठरतात आणि त्यामुळे समाजात एक दुसऱ्यावर अन्याय करु लागतात. अन्याय करण्यास ते जनतेला एक प्रकारची सूट देतात आणि अशा प्रकारे शासनकर्ते स्वतःजनतेवर अन्याय करु लागतात.

शासनकर्त्यांचे कर्तव्य आहे की समाजात सुव्यवस्था निर्माण करून जनतेच्या मनात स्थैर्य निर्माण करावे. जनतेला सुरक्षितता प्रदान करावी आणि त्यांच्या मनात याविषयी विश्वास निर्माण करावा की अन्याय करणाऱ्याला त्याची शिक्षा भोगावीच लागेल. परिणामतः लोक एक दुसऱ्यावर अन्याय करणार नाहीत आणि समाजात न्याय प्रस्थापित होईल. अशा समाजात खूनी माणसाला मृत्यू दंड दिला जातो, अत्याचारीला त्याने केलेल्या अत्याचाराची शिक्षा भोगावीच लागते. कुणी कुणाचा हक्क हिरावून घेऊ शकतच नाही आणि दुसऱ्याची इज्जत घेणारा समाजात स्वतःच बेइज्ञत बनतो. अशा समाजव्यवस्थेत दुराचारी दुराचार करण्या अगोदर शंभर वेळा विचार करील. परंतु जिथे शासन बेपर्वा, कर्तव्यहीन आणि अयोग्य ठरते अशा समाजात शासनकर्ते अत्याचारी बनतात. दुराचारींना अशा ठिकाणी मोकळे रान सापडते. जनता शासनकर्त्यांच्या अन्यायाला व अत्याचाराला एकीकडे सहन करते तर दुसरीकडे समाजातील दुराचारींच्या दुराचारांना.

राज्यकर्त्यांच्या अन्यायीवृत्तीचे दुसरे स्वरुप ''घराणे शाही'' आहे. शासनसत्तेचे फायदे आपल्या कुटूंबापुरतेच जास्तीत जास्त एकवटले गेले पाहिजेत ही मानसिकता त्यात कार्यरत असते. मग त्या फायद्यांसाठी कुटूंबातील लोक पात्र असो किंवा नसोत. जनतेचे हक्क लाटून ते सर्व स्वतः आणि स्वतःच्या नातेवाईकांसाठी खैरात केले जातात. हा एक घोर अन्याय आहे. समाजात जो नालायक आहे त्याला फायदा होतो म्हणजेच समाजातील पात्र व लायक माणसांशी अन्याय केला जातो. शासनाचे एखादे पद आपल्या नात्यातील लायक नसलेल्या व्यक्तीला दिले गेल्यास जो पूर्णपात्र व त्या पदासाठी लायक होता त्यावर निश्चितच अन्याय केला जातो. अशा शासन व्यवस्थेत नालायकांना संधी आणि सवलती उपलब्ध होतात. आणि पात्र आणि लायक व्यक्तींवर घोर अन्याय केला जातो. जेव्हा कमी टक्केवारीने पास झालेल्या विद्यार्थ्यांना भ्रष्टाचाराने आणि वशिल्याने शैक्षणिक संस्थात प्रवेश मिळतो तर अशावेळी हुशार आणि पात्र विद्यार्थ्यांवर घोर अन्याय होतो. वशिल्याने आणि भ्रष्टाचाराने एखादी व्यक्ती आपल्या पाल्यास बोर्ड अथवा विद्यापीठात गुणवत्ता यादीत आणते तेव्हा निष्पात आणि पात्र विद्यार्थ्यांवर अन्याय केला जातो. प्रथम येण्याचा त्याचा हक्क मारला जातो.

तसेच एखाद्या पक्षकाराच्या बाजूने निर्णय ह्यासाठी दिला जातो की तो न्यायधिशाचा नातेवाईक आहे. अशा स्थितीत समोरच्या पक्षाचा हक्क हिसकावून घेतला जातो व त्यावर घोर अन्याय केला जातो. अशा प्रकारे आपल्या कुटूंबाला आणि नातेवाईकांवर सवलतींची आणि संधीची खैरात करून राज्यकर्ते समाजातील हकदारांचे हक्क मारून घोर अन्यायच करतात. म्हणून पारलौकिक जीवनात जे राज्यकर्ते आणि शासनकर्ते अल्लाहसमोर न्यायप्रिय म्हणून हजर होऊ इच्छितात आणि इहलोकी सुध्दा सफल बनू इच्छितात त्यांनी जनतेचे जीव, वित्त आणि ईज्जतीचे रक्षण करण्यासाठी जितकी जबाबदारी येते ती प्रामाणिकपणे पार पाडण्यासाठी प्रयत्नशील रहावे. जनतेचे हक्क अदा करतांना सतर्क राहिले पाहिजे वशिल्याने आपल्या नातेवाईंकासाठीच सत्तेचा फायदा उठवू नये. जनतेला अन्यायाविरुध्द आवाज उठविण्यासाठी स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे. ह्यात शासनकर्त्यांचा सुध्दा फायदा आहे हे ओळखले पाहिजे. कारण जनतेला आंदोलनाचा, सत्याग्रहाचा हक्क दिल्याने त्या शासनकर्त्यांना त्यांची चूक कळून येते. अन्यथा जनतेची मुस्कटदाबी केल्याने समाजात अन्याय, अत्याचार बोकाळत राहिला तरी शासनकर्ते ह्या गैरसमजूतीत राहतात की ते न्याय करीत आहेत. साधारणतः मनुष्याला स्वतःच्या चूका कळून येत नाहीत. तर त्या दूसऱ्यानांच दिसून येतात. ज्या जनतेवर शासनकर्त्यांचा अन्याय व अत्याचार होत असेल त्यांची तोंडे बंद असतील तर राज्यकर्त्यांना व शासनकर्त्यांना कोण सांगेल की ते अन्यायी व अत्याचारी आहेत. त्यांच्या अन्यायी व अत्याचारी वृत्तीचा बळी शासन स्वतः ठरण्यापेक्षा त्या शासनाला सावध करणे तर त्यांच्या भल्याचेच आहे. कारण शासन वेळेतच आपल्यात सुधारणा करून वाईट परिणामांपासून सुटका घेते. वाईट परिणामांना तर इहलोकी आणि परलोकी दोन्ही जगात सामोरे जावे लागते. ईशपरायण शासनकर्ते पूर्वीतर जनतेला आपली चूक दाखून देण्याचे आव्हान करीत असत माननीय अबु बकर खलिफा (राजाध्यक्ष) बनल्यानंतर त्वरित प्रथम भाषण देतांना म्हणाले होते की,

''लोकहो, मी तुमचा राज्यकर्ता बनविला गेलो आहे. तसे पाहता मी तुमच्यापैकीच एक आहे. तुमच्या पैकी जास्त काही नाही. मी जर चांगले कार्य

केले तर माझी मदत करा आणि मी वाईट कृत्य केले तर मला टोकत राहा.''

तसेच द्वितीय खलिफा माननीय उमर (र.) यांनी लोकांना आदेश दिला होता की,

''हे श्रध्दावंतांनो, माझ्यावर तुमचे अनेक हक्क आहेत ज्यांच्या विषयी तुम्ही मला विचारणा करू शकता.''

त्यांना आपण सरळ मार्गावर चालत आहोत की नाही याची सतत काळजी वाटत असे. त्यांनी एके दिवशी त्यामुळे समोरच्या श्रोत्यांना उद्देशून सांगितले की,

''आदरणीय जनहो, मी जर भौतिकतेकडे जास्त झुकलो तर तुम्ही काय कराल?''

ह्यावर एक व्यक्ती उठून आपली तलवार म्यानेतून बाहेर काढून म्हणाला,

''आम्ही आपले शिर आपल्या धडा वेगळे करून टाकू.''

माननीय उमर (र.) यांनी त्याची परीक्षा घेण्यासाठी त्याला रागात विचारले,

''काय तु माझ्यासाठी असे अनुद्‌गार काढत आहे?'' त्या माणसाने उत्तर दिले, ''होय, होय, आपल्यासाठीच, ह्यावर माननीय उमर (र.) म्हणाले, अल्लाहची स्तुती असो, आमच्या समाजात असे लोक आहेत जे मला चूक करतांना पाहतील तर मला सरळ करतील.''

न्यायालयातील न्यायनिष्ठा

समाजात चहुकडे अन्याय होतो. परंतु न्यायालयें जिथे लोक न्याय मिळण्यासाठी जातात तिथे जर न्याय प्राप्त होत नसेल तर न्यायालयांचे अस्तित्वच धोक्यात येते. न्यायनिवाडा करण्याचे काम करणाऱ्यांना अरबी भाषेत 'काझी' म्हणतात. ह्या शब्दाची उत्पत्ति 'कज़ा' ह्या शब्दापासून होते ज्याचा अर्थ निर्णय देणे असा आहे. नायब तहसीलदार, तहसीलदार, मॅजिस्ट्रेट, सिव्हील जज, सेशन जज, हायकोर्ट जज किंवा सुप्रिम कोर्ट जज या सर्वांनाच 'काझी' म्हणून संबोधले जाते.

माननीय अबू हुरैरा (र.) निवेदन करतात की प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे की 'जो कोणी लोकांच्या दरम्यान काझी (निर्णय देणारा) बनविला गेला तो बिना सुरीचा कापला गेला.'' (अबु दाऊद)

वरील अर्थपूर्ण वाक्याद्वारे प्रेषित (स.) यांनी सुचित केले आहे की जो कोणी काझी बनविला गेला त्यावर त्याने कुणाचाही मुलाहिजा न ठेवता सत्यानिशी न्याय निवाडा करावा. वशिल्यामुळे, भ्रष्टाचारामुळे किंवा इतर अनेक दडपणांमुळे न्याय फिरवू नये. न्याय करण्यात गफलतीने आणि अज्ञानाने काम घेऊ नये. काझी समाजाचाच एक भाग आहे त्यामुळे समाजातून त्याच्यावर दडपण येवून तोच चुकीचा न्याय देऊ शकतो. शक्य आहे की अपराधी त्याचा सगेसंबंधी असावा किंवा सत्यानिशी न्याय दिल्यास स्वत:ला नुकसान होत असेल तर अशा स्थितीत निरपराध्याला शिक्षा देवून आपल्या बाजूने न्याय करीत असेल तर परलोकी अल्लाहच्या कोप होण्यास पात्र ठरतो. ह्यालाच प्रेषित (स.) यांनी विना सुरीचे कापले जाणे असे म्हटले आहे. अशा प्रकारे न्यायाधिशावर फार मोठी जबाबदारी येऊन पडते. काझीला (न्यायाधिश) अशा महान जबाबदारीला पेलावे लागते जे अशक्य प्राय काम आहे. ह्या शैलीत न्यायाधिशांची जबाबदारीचा उल्लेख करून आदरणीय प्रेषित (स.) यांनी त्यांना ताकिद केली आहे की त्यांनी आपले कर्तव्य इहलोकी फायद्याकडे दुर्लक्ष करून ईशपरायणतेने सत्यानिशी पार पाडावे. प्रेषित (स.) यांनी न्यायधिशांसाठी खालील आदेश दिले.

१) निर्णय देण्या अगोदर दोन्ही पक्षकारांची बाजू लक्षपूर्वक ऐकावी. फक्त एकच बाजू ऐकून निर्णय देऊ नये.

२) निर्णय देतांना न्यायपूर्ण आणि सत्यानिशी निर्णय द्यावा. जो दावा समोर असेल त्याचे गांभिर्यपूर्वक अध्ययन केले जावे. अभ्यासाविना बेपर्वाहीने निर्णय देऊ नये.

३) सत्य उघड करण्यासाठी पूर्ण प्रयत्न करावा आणि त्यानुसार निर्णय दिला जावा. अन्यायपूर्वक निर्णय दिला जाऊ नये.

(१) माननीय अली (र.) निवेदन करतात की प्रेषित (स.) यांनी मला न्यायधिश (काझी) बनवून यमनला पाठविले. मी विनंती केली की

प्रेषित (स.) आपण मला तर पाठवित आहात परंतु मी अल्पवयीन आहे आणि मला न्याय करता येत नाही. प्रेषित (स.) यांनी सांगितले, "अल्लाह तुझ्या मनाला मार्गदर्शन करील आणि तुझ्या जिव्हेला अटळ ठेवील. तुम्ही ह्या गोष्टींचे ध्यान ठेवा की जेव्हा ते भांडण करणारे तुझ्याकडे न्याय मागण्यासाठी आले तर फक्त एक पक्षाची बाजू ऐकूण निर्णय देऊ नका. त्यासाठी दुसऱ्याची बाजु सुध्दा ऐकून घ्या. जर तुम्ही असे कराल तर खरा न्याय देणे तुमच्यासाठी सहज शक्य होईल. माननीय अली (र.) यांचे कथन आहे की जेव्हा प्रेषित (स.) यांनी मला हा उपदेश केला तेव्हा पासून मी निर्णय देत गेलो आणि मला निर्णय देण्यात न्यायनिवाडा करण्यात अडचण अशी आली नाही." (अबू दाऊद)

फारशी भाषेत एक म्हण आहे "तनहा बकाझी बर वराजी बया" म्हणजे काझी (न्यायधिश) कडे एकटे जा आणि संतुष्ट होऊन परत या. कारण अशा स्थितीत काझी तर निर्णय तुझ्याच बाजूने देईल. एखाद्या निवाड्यात निर्णय तेव्हाच दिला जाऊ शकतो जेव्हा निवाडा करण्याचे सर्व बाबी समोर असतील आणि दोन्ही पक्षांना आपापली बाजू मांडण्याची संधी दिली जाते. एक पक्ष फक्त त्याच्या फायद्याचीच बाजू पुढे मांडतो म्हणून प्रेषित (स.) यांनी दोन्ही पक्षकारांची बाजू (म्हणणे) ऐकून घेतले जावे अशी ताकीद केली.

(२) माननीय उमर बीन आस (र.) कथन करतात की प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे की निर्णय देणाऱ्याने विचारांती निर्णय द्यावा आणि सत्यनिशी न्याय करावा. अशा व्यक्तीसाठी दोन फायदे आहेत. जेव्हा त्याने खूप विचार करून न्याय दिला परंतु तो चुकीचा निर्णय होता. अशा स्थितीत सुध्दा त्याला फायदा मिळले." (अबु दाऊद)

वरील हदीस मध्ये एक वैशिष्टयपूर्ण आदेश आहे की न्याय करणाऱ्याने खूप विचार करून अभ्यासांति न्याय द्यावा. त्याचा निर्णय योग्य असेल तर त्याला दोन फायदे मिळतील. एक चिंतन मनन आणि अभ्यास करण्यासाठी आणि दुसरा कायदा ह्या बद्दल की त्याने दिलेला न्याय योग्य आहे. परंतु चिंतन मनन आणि अभ्यास पूर्ण करून सुध्दा निर्णय चुकीचा दिला तरी त्याला एक फायदा (पुण्य) जरूर मिळले कारण त्याची इच्छा होती की योग्य निर्णया प्रत यावे आणि त्यासाठी

त्याने प्रयत्न केला होता. म्हणून निर्णय जरी चूकीचा झाला तरी त्याच्या नेक नियतीसाठी आणि केलेल्या प्रयत्नांसाठीचा मोबदला मिळणारच.

(३) माननीय अबु हुरैरा यांचे पिता निवेदन करतात की प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे की काझी (न्यायाधिश) तीन प्रकारचे असतात. त्यांच्यापैकी एक स्वर्गात जाईल आणि दोन नरकात जातील. स्वर्गात जाणाऱ्याने सत्याला ओळखले होते आणि सत्यानिशी न्यायदान (निर्णय) करत होता. ह्या विरुध्द ज्याने सत्याला ओळखले होते परंतु निर्णय (न्याय) मात्र अत्याचार आणि अन्याय पूर्वक देत होता, असा मनुष्य नरकात जाईल. तसेच ज्याने लोकांना अज्ञान पूर्वक, बेपवाईने न्यायदान केले, तो सुध्दा नरकातच जाईल.'' (अबु दाउद)

नादानीने निर्णय देणारा नरकात ह्यामुळे जाईल की तो नादान होता तर न्यायधिशाचे कार्य का म्हणून हाती घेतले? तसेच निर्णय देतांना इस्लामी समतेला नजरे समोर ठेवणे आवश्यक आहे. इस्लाम मध्ये श्रीमंत-गरीब, लहान-मोठा, उच-निच हा भेदभाव नाही. मात्र इतर धर्मात ही भेदभावनीति सर्रास पाळली जाते. इस्लामध्ये सर्व एक समान आहेत. येथे गरीब मनुष्य आपल्या योग्यतेनुसार समाजात उच्चस्थानी पोहचू शकतो. मशिदीत सामुदायिकपणे नमाज अदा करतांनाचे दृष्य पहा तिथे तुम्हाला इस्लामी समानता स्पष्ट दिसेल. तिथे श्रीमंत गरीब व राजा आणि रंक एका ओळीत खांद्याला खांदा लावून उभे राहीलेले तुम्ही पहाल. आदेश आहे जो प्रथम मशिदीत प्रवेश करतो त्याला पहिल्या ओळीत स्थान प्राप्त होते मग तो अति गरीब का असेना. नंतर येणारा मग तो कितीही श्रीमंत अथवा मोठा अधिकारी असेना त्याला पुढील रांगेत एखाद्याला उठवून बसण्याचा अधिकार पोहचत नाही. तो नंतरच्याच रांगेत बसतो. कायद्या पुढे सुध्दा सर्व समान आहेत. राजाने अपराध केला तर धर्म शास्त्राप्रमाणे (शरीयत) त्याला शिक्षा होणारच. गरीबीतील माणसाला अशा स्थितीत न्यायापासून रोखले जात नाही. तसेच श्रेष्ठता मनुष्याच्या खानदान आणि पदावर ठरविली जात नाही तर त्याच्या ईशपरायणतेने आणि आचरणाने ठरविली जाते. दिव्य कुरआन मध्ये अल्लाहने स्पष्ट केले आहे,

''लोकहो, आम्ही तुम्हाला एक पुरुष आणि एक स्त्री पासून निर्माण

केले. मग तुमचे राष्ट्र आणि वंश बनविले जेणे करून तुम्ही एक दुसऱ्याला ओळखावे. वस्तुतः अल्लाहजवळ तुमच्यापैकी तोच प्रतिष्ठित आहे जो तुमच्यापैकी सर्वात जास्त ईशपरायण आहे. निःसंदेह, अल्लाह सर्वकाही जाणणारा आणि ऐकणारा आहे.'' (सूरे अल्‌हुजरात १३)

माननीय माता आयशा (र.) यांचे निवेदन आहे की कुरैश एका अपराधी स्त्री विषयी चिंतीत होते जिने चोरी केली होती. आणि प्रेषित (स.) यांनी तिचा हात कापण्याचा आदेश दिला होता. कुरैशांनी विचारले की आता हिच्या विषयी कोण प्रेषित (स.) यांच्या जवळ शिफारस करील? लोकांनी सांगितले की असामाबीन जैद (र.) यांचे आणि प्रेषित (स.) यांचे प्रेमाचे धनिष्ठ संबंध आहेत. तेच सांगू शकतील. आसामा (र.) यांनी प्रेषित (स.) यांच्याशी वरील विषयानुरुप वार्तालाप केल्यावर प्रेषित (स.) यांनी सांगितले की ''काय तुम्ही अल्लाहने घालून दिलेल्या मर्यादापैकी एका मर्यादेसाठी शिफारस करत आहात?'' प्रेषित (स.) उठून उभे राहिले आणि सांगितले की,

''तुमच्या पूर्वीच्या राष्टांचा नाश ह्याचमुळे झाला की त्यांच्यापैकी एखाद्या प्रतिष्ठित आणि मोठा मनुष्य चोरी करत असे तेव्हा त्याला सोडून दिले जात असे. आणि जेव्हा गरीब आणि असहाय चोरी करायचा तेव्हा त्याला शिक्षा देत असत. अल्लाह शपथ ! माझी मुलगी (फातिमा(र.)) हीने जर चोरी केली असती तर मी तिचे हात जरूर कलम केले असते.''

न्यायाची निकड

एखाद्या समाजात न्याय स्थापित करावयाचा असेल तर त्यासाठी काही अटी पाळल्या जाणे आवश्यक ठरते. १) समाजातील गरीब असहायलोकांना त्यांचे हक्क सहजासहजी प्राप्त होणे आवश्यक आहे. २) न्यायाची समाजात खरेदी विक्री होऊ नये. न्यायाचा बाजार मांडला जाऊ नये. ३) एखाद्याच्या अपराधाची शिक्षा दुसऱ्याला मिळु नये. ४) न्याय करण्याच्या न्यायधिशांचे वैयक्तिक हित संबंध, नाते संबंध न्यायदान प्रक्रियेत आड येऊ नयेत.

१) गरीबांना सहजतेने त्यांचा हक्क मिळणे - ज्या समाजात न्याय विषयक व्यवस्था अशा प्रकारे असेल की जिथे गरीबांना सहजतेने आणि बिना

कष्ट न्याय मिळत असेल, त्यांचा हक्क मिळत असेल तर अशा समाजाचे हे एक महत्वपूर्ण वैशिष्टय आहे. श्रीमंत, पदाधिकारी अथवा बडी मंडळी शक्तीच्या जोरावर आपले हक्क प्राप्त करून घेतात. समाजात असा बड्या मंडळीना त्यांचे हक्क मिळत राहाणे विशेष बाब नाही तर त्या समाजाचे मोठे वैशिष्टय हे ठरते की शक्तीहीनांना तिथे सहज सुलभतेने त्यांचे हक्क व न्याय मिळत आहे. जर अशा गरीब आणि शक्तीहीनांना न्याय तर मिळतो परंतु अति कष्टाने तर अशा स्थितीत सुध्दा त्या समाजाला वैशिष्टय पूर्ण समजले जावू शकत नाही. गरीबांना सहज सुलभतेने न्याय मिळणे हे त्या समाजाचे खास वैशिष्टय ठरते.

माननीय अबु सईद खुदरी (र.) निवेदन करतात की एक खेडुत प्रेषित (स.) यांच्याकडे कर्जाच्या तगाद्यासाठी आला ज्याला त्याने प्रेषित (स.) यांना दिले होते. तो प्रेषित (स.) यांच्याशी कडक शब्दात बोलू लागला. प्रेषित (स.) यांचे सहकारी (सहाबा (र.)) त्याला ओरडून म्हणाले "तुझा नाश होवो. तुला माहित आहे का तू कुणाशी बोलतोस?" तो म्हणू लागला मी तर आपला हक्क मागत आहे. त्यावर प्रेषित (स.) यांनी सहाबा (र.) यांना सांगितले की तुम्ही हक़दाराची मदत का करत नाही." नंतर प्रेषित (स.) यांनी कुणाला तरी खौला (र.) यांच्याकडे काही खजुरी कर्ज म्हणून मागण्यासाठी पाठविले. त्यांनी त्वरित प्रेषित (स.) यांना खजूरी पाठवून दिल्या आणि प्रेषित (स.) यांनी त्या खेडुताचे कर्ज फेडले आणि त्याला जेवू सुध्दा घातले. त्यावर तो खेडुत म्हणू लागला की "आपण माझा हक्क परिपूर्ण अदा केला आहे. अल्लाह आपणास भरभरून देवो." त्यावर प्रेषित (स.) म्हणाले, "ते श्रेष्ठतम लोक आहेत जे दुसऱ्यांचा हक्क पूर्ण अदा करतात. तो समाज कधीही पवित्र होत नाही ज्यात शक्तीहीनांना कष्टविना न्याय मिळू शकत नाही." (इब्ने माजा)

माननीय जाबीर (र.) कथन करतात की जेव्हा हबशा (आफ्रीका) कडे गेलेले लोक प्रेषित (स.) यांच्याकडे परत आले तेव्हा प्रेषित (स.) यांनी विचारले की काय तुम्ही मला त्या अद्‌भुत गोष्टी सांगणार नाहीत ज्या तुम्ही आफ्रिकेत पाहिल्या आणि अनुभवल्या आहेत?" त्यावर काही तरुणांनी सांगितले की प्रेषित (स.) ! आम्ही तुम्हाला त्या गोष्टी सांगतो. एके दिवशी

आम्ही बसलो असतांना तेथील एक म्हातारी आमच्या जवळून गेली तिच्या डोक्यावर पाण्याचे माठ होते. एक निग्रो तरुणाजवळून ती जात असतांना त्याने त्या म्हातारीला खांद्यावर हात ठेवून धक्का दिला. ती म्हातारी खाली पडली व तिचा माठ फुटला. ती उठून त्या तरुणाला उद्देशून म्हणाली की लवकरच तुला कळून चुकेल की ह्या अत्याचाराची शिक्षा तुला काय मिळणार आहे जेव्हा अल्लाह सर्वांना त्याच्या समोर गोळा करील आणि हाताने आणि पायाने काय काय अत्याचार केले आहे ते सर्व पुढे येतील. मग तू जाणून घेशील की उद्या अल्लाह समोर तुझा आणि माझ्या दरम्यान काय निर्णय लागणार आहे. हे ऐकून प्रेषित (स.) यांनी सांगितले की त्या स्त्रीने सत्य सांगितले. कसे पवित्र करील अल्लाह त्या समाजाला ज्यात शक्तीशाली शक्तीहीनांशी अन्यायाने वागतात.''

(इब्ने माजा)

न्यायाचा बाजार मांडला जाऊ नये

समाजात न्याय स्थापनेसाठी गरजूंना न्याय विकत घ्यावा लागू नये. ज्याला न्यायाची किंमत देता येत नसेल (न्याय खरेदी करता येत नसेल) असा गरीब न्यायापासून वंचित राहातो. कधी कधी असे घडते की कुणा वर अत्याचार होतो. कुणी कुणाचा माल, संपत्ती हडप करतो, कुणाच्या जीवाला, इज्ज़तीला धोका निर्माण होतो किंवा कुणावर अन्य अत्याचार केले जातात. अशा वेळी ती व्यक्ती दाद मागण्यासाठी न्यायालयाचे दार ठोठावते. न्याय मिळविण्यासाठी त्याला इतकी रक्कम मोजावी लागली की तो शेवटी कर्जबाजारी बनतो. त्यांच्या संकटात आणखी एका संकटाची भर पडते. खर तर तो न्याय जो महागडा न्याय असतो. न्याय म्हणण्याच्या लायकच नसतो. अशा महागड्या न्यायव्यवस्थेत गरीबांना त्यांचा हक्क सोडून देणे परवडते. एखादा आपली हडप केलेली संपत्ती पुन्हा मिळविण्यासाठी न्यायालयात जातो. त्याला त्यासाठी इतकी संपत्ती खर्च करावी लागते की हडप केलेल्या संपत्ती पेक्षा न्याय प्राप्तीसाठी खर्च केलेली संपत्ती अधिक असते. प्रेषित (स.) यांची शिकवण आहे,

''ते राष्ट्र कधीही पवित्र होऊ शकत नाही जिथे गरजूंना कष्टाने न्याय मिळवावा लागतो.''

विचारांति कळून येते की गरजूंना अशा न्याय व्यवस्थेत न्याय मिळविण्यासाठी अतिकष्ट झेलावे लागतात. म्हणून समाजात आणि देशात न्याय स्थापित करण्यासाठी आवश्यक आहे की न्यायव्यवस्था अशी असावी की जनतेला न्याय प्राप्त करण्यासाठी पैसा खर्च करावा लागू नये. कारण अशा स्थितीत न्याय सर्वांसाठी राहूच शकत नाही तर फक्त त्यांच्यासाठीच मर्यादित बनुन राहील जे त्यासाठी पैसे खर्च करू शकतात.

कोणी कोणाचे ओझे उचलणार नाही

"कोणी ओझे उचलणारे कोण्या दुसऱ्याचे ओझे उचलणार नाही." हे दिव्य कुरआनचा अध्याय अन्आमची १२४ नंबरची आयत (वचन) आहे. अर्थ असा आहे की जो कोणी अपराध करील त्याला त्याची शिक्षा भोगावीच लागेल. त्याच्या त्या अपराधाची शिक्षा त्याच्या नातेवाईकाला, कुटूंबातील व्यक्तीला दिली जाणार नाही. इस्लाम पूर्व अरब लोकात ज्या वाईट प्रथा होत्या त्यापैकी एक ही होती. एखाद्या टोळीतील व्यक्तीने दुसऱ्या टोळीच्या व्यक्तीला ठार मारले तर खुनी व्यक्तीला शिक्षा न देता त्याच्या नातेवाईकांचा अथवा टोळीतील एखाद्याचा खून केला जात असे. एखाद्या शक्तीशाली व्यक्तीचा खून एखांद्या गरीबाने केल्यास फक्त त्यालाच ठार केले जात नसे. तर त्याच्या कुटूंबाचा सुध्दा काटा काढला जात असे. अनेकांना ठार केले जात असे. पिढ्या न पिढ्या खून खराबा चालत असे.

आदरणीय प्रेषित (स.) यांनी अरबांच्या दुसऱ्या कुप्रथांसह ह्या कुप्रथेला नष्ट केले. खूनाचा बदला खूनी व्यक्ती कडूनच घेतला जावा दुसऱ्यांला शिक्षा दिली जाऊ शकत नाही. ठार झालेली व्यक्ती मोठी असो की गरीब, खूनी व्यक्तीचाच जीव बदल्यात घेतला जाईल.

"तारीक मुहारबी निवेदन करतात की एका माणसाने प्रेषित (स.) सांगितले की बनू सलीबा परिवाराचे हे लोक आहेत. त्यानी अज्ञान काळात अशा अशा व्यक्तीला ठार केले होते. आपण त्यांच्या पासून आमचा बदला द्यावा. ह्यावर प्रेषित (स.) यांनी आपले दोन्ही हात इतके उंच केले की मी प्रेषित (स.) यांच्या काखेतील पांढरा भाग पाहुन घेतला. प्रेषित (स.) यांनी सांगितले की आईच्या अपराधाची शिक्षा मुलाला होवू शकत नाही. "प्रेषित (स.) यांनी हे दोनदा सांगितले." (निसानी)

''अबु रमशा (र.) निवेदन करतात की एकदा ते आपल्या पित्यासह प्रेषित (स.) यांच्याकडे गेले. प्रेषित (स.) यांनी वडीलांना विचारले की काय हा तुझा मुलगा आहे? माझ्या बापाने होकारार्थी उत्तर दिले. प्रेषित (स.) यांनी सांगितले की तुमच्या अपराधाची शिक्षा त्याला (मुलाला) दिली जाणार नाही, मुलाच्या अपराधाची शिक्षा तुम्हाला होणार नाही. नंतर प्रेषित (स.) यांनी दिव्य कुरआनचा अध्याय अन्आमची आयत नं. १२४ चे पठण केले. (कोणी ओझे उचलणारा कुण्या दुसऱ्याचे ओझे उचलणार नाही)'' (अबु दाऊद)

वैयक्तिक अथवा इतर फायद्यासाठी न्याय प्रक्रियेत अडथळे निर्माण करू नका. दिव्य कुरआनच्या अन् निसा अध्यायातील आयत नंबर २० मध्ये अल्लाहने स्पष्ट आदेश दिला आहे की,

''हे लोकहो, ज्यानी ईमान धारण केले आहे. न्यायाचे ध्वजवाहक आणि अल्लाहसाठी साक्षीदार बना. तुमचा न्याय आणि तुमची साक्ष तुमच्या स्वत:साठी आणि तुमच्या आईवडीलांवर व नातेवाईकासाठी विरोधी का ठरू नये. दावेदार गरीब असो की श्रीमंत, अल्लाह त्यांचा तुमच्या पेक्षा जास्त हितकारक आहे. म्हणून आपल्या इच्छापूर्तीसाठी न्यायाच्या आड येऊ नका आणि तुम्ही उलटे सुलटे केले आणि सत्याशी दूर गेले तर जाणून असा की तुम्ही जे काही करता अल्लाहला त्याची खबर आहे.'' (४:२०)

ह्या कुरआनोक्तीचे स्पष्टिकरण देतांना सय्यद सुलेमान नदवी (रह) सांगतात की ह्या कुरआनोक्तीत न्यायाविरोधी सर्व बाबींना मूळासकट उखडून फेकण्यात आले आहे आणि आदेश देण्यात आला की आचरण न्यायपूर्ण करा. करणी आणि कथनी न्यायनिष्ठ असावी. न्याय देतांना आणि साक्षी देतांना 'स्व' ला मध्ये आणू नका. आणि नातेवाईकांचे हित पाहू नका. श्रीमंतांची बाजु घेऊ नका तसेच गरीबांवर दया दाखविण्यासाठी न्यायापासून दूर जाऊ नका. अल्लाह तुमच्यापेक्षा जास्त त्यांचा हितकारक आहे. संदिग्दता न्याय प्रक्रियेत ठेवू नका. सत्य स्पष्ट करा सत्य लपवून ठेवू नका. हे सर्व न्यायाच्या विरुध्द आहे. एखाद्या गरीबाच्या गरीबीला पाहून निर्णय बदलून त्याला न्याय देणे वरकरणी पुण्यकर्म वाटत असेल तरी तो धोका आहे, अन्याय आहे. न्यायधिशासाठी चांगली किंवा वाईटभावना

न्यायप्रक्रियेत अडथळा बनू नये. जो एखाद्याचा फायदा होण्यासाठी साक्ष देत असेल तर तो अन्याय करतो. साक्ष आणि न्यायाच्या मामल्यात अल्लाह तुमच्यावर लक्ष ठेवून आहे. तुमचा उत्कृष्ठ सहायक अल्लाहपेक्षा दुसरा कोण असू शकतो?'' (सिरतुन नबी खंड ६ वा पृष्ठ ४६१)

दिव्य कुरआनातील अध्याय निसा मध्ये एका घटनेकडे ईशारा केला जी घटना प्रेषित काळात घडली. बनी जफर नामक परिवारात एक तआमा नावाचा मनुष्य होता. त्याने एका अन्सारीचे चिलखत चोरले. त्याची विचार पूस सुरु झाली तेव्हा ते चिलखत एका यहुदीकडे त्याने ठेवले. मालकाने प्रेषित (स.) यांच्याकडे जाऊन तक्रार केली आणि तआमा विषयी संशय घेतला. परंतु तआमा आणि त्याच्या नातेवाईकांनी मिळून त्या ज्यू (यहुदी) ला चोर ठरविले. यहुदी माणसाला विचारल्यावर त्याने जे काही घडले ते सांगितले परंतु सर्वांनी तआमाची बाजूला लावून धरली. तआमाच्या बाजूने अनेकांना पाहुन प्रभावित होवून प्रेषित (स.) यहुदी विरुध्द निर्णय देणार तोच दिव्य प्रकटन झाले,

''जे आपल्या इच्छा आकांक्षा मागे पळतात त्यांची तुम्ही तरफदारी करू नका. अल्लाहला धोकेबाज आणि चालबाज लोक पसंत नाहीत. हे लोकांपासून आपल्या कारवाया लपवू शकतात परंतु अल्लाहशी लपवू शकत नाही. तो तर त्यावेळी सुध्दा त्यांच्या सोबत असतो जेव्हा हे रात्री लपून त्याच्या मर्जी विरुध्द सल्लामसलती करतात. त्यांच्या सर्व कारवांयाची अल्लाहला खबर आहे. तुम्ही तर जगात त्या लोकांसाठी भांडण केले परंतु अंतिम दिनी ह्या लोकांसाठी कोण भांडेल ? तिथे कोण त्यांचा सहायक (वकील) असेल?'' (सूरे निसा : १०८-१०९)

अल्लाहने दिव्य कुरआन मध्ये ह्याच अध्यायात पुढे स्पष्ट केले आहे की,

''मग ज्याने एखादे अपराध करून त्याला दुसऱ्या कुण्या निरपराध व्यक्तीच्या माथी मारले तर त्याने मोठे आळ घेतले आणि मोठा गुन्हा केला आणि संमत शिक्षेला स्वत:हुन सामोरे गेला.''

वरील संकेत वचनात त्या श्रध्दावंतांना लक्ष केले गेले जे आपल्या खानदानाच्या आणि वंशाच्या प्रतिष्ठेसाठी अपराधींच्या समर्थनार्थ उभे राहतात. दुसरीकडे सर्वसामान्य श्रध्देय जनांना उपदेश केला आहे की न्याय प्रक्रियेत पूर्वग्रह दुषितता आड येऊ नये. हे अगदी अन्याय पूर्ण कार्य आहे की

आपल्या जवळच्या मनुष्याने अपराध केला तर त्याच्या बाजूने समर्थन करावे आणि दुसरा कोणी निरपराध असून सुध्दा अपराधाची शिक्षा त्याला द्यावी. हे अतिहीन कृत्य आहे.

दिव्य कुरआनच्या अध्याय अनआमच्या आयत नंबर १५२ मध्ये अल्लाहने आदेश दिला आहे,

''जेव्हा बोलू लागाल तेव्हा न्यायानिष्ठतापूर्ण बोला मग आपल्या सगे सोयऱ्यांच्या बाबतीतले प्रकरण का असेनात''

न्याय करण्यात विलंब नको

शेवटी हे सुध्दा समजून घेतले पाहिजे की न्यायनिवाडा करण्यात मर्यादे पलिकडे विलंब होता कामा नये. विलंबित न्याय हा अन्यायच असतो न्यायाधिशाचे कर्तव्य आहे की खटल्याच्या सर्व बाबींचा अभ्यास करून आणि विचार करूनच न्याय द्यावा आणि घाईघाईने निर्णय देऊ नये. तरी पण प्रत्येक कामाची एक मर्यादा ठरलेली असते. मनुष्य जर त्या मर्यादेपलिकडे जाऊ लागला तर अन्याय व अत्याचार घडू लागतो. आजकाल न्यायालयात दावे निकालात काढण्यासाठी इतका उशीर होतो की दावेदार अतित्रस्त होतात. वर्षानुवर्षे सुनावणी चालतच राहाते निर्णय मात्र लागत नाही. तारखांवर तारखा दिल्या जातात आणि लोक मात्र निराश होतात.

न्याय प्रक्रियेचा हा मर्यादे पलिकडील विलंब लोकांना अडचणीत तर टाकणारा आहेच पण अति विलंब लावण्यात लोकांना तोटा सहन करावा लागतो. उदा. एका अल्प भूधारकाकडे जमिनीचा लहानसा तुकडा आहे. ज्यावर त्याला स्वतःचे घर बनवायचे आहे. त्या जमिनीवर कोणीतरी अवैध कब्जा केला आहे. दावा न्यायलयात आहे. एका न्यायालयातून दुसऱ्या आणि दुसऱ्यातून तिसऱ्या न्यायालयात हा दावा हस्तांतरित होत जातो. प्रत्येक ठिकाणी हा दावा रखडून पडतो. शेवटी १०/१२ वर्षांनी निर्णय मालकाच्या बाजूने जरी लागला तरी आज बांधकाम साहित्याचे भाव गगनाला भिडल्यामुळे तो अल्पभूधारक शेतकरी स्वतःचे घर बांधू शकत नाही. जर ह्या दाव्याचा वेळेत निर्णय लागला असता तर तो गरीब शेतकरी स्वतःच्या घरात आता राहू

शकला असता. विलंबाने दिलेला न्याय हा अन्याय असतो. तसेच येथे आपण दुसरे एक उदाहरण पाहूया.

एक नव विवाहित मुलगी आपल्या पतिराजाच्या गैरवर्तनामुळे अति दुःखी आहे. तिला पति रोज मारहान करतो. मुलीचे आईवडील आपल्या मुलीला घटस्पोट घेऊ इच्छितात. घटस्फोट घेतल्यावर दुसऱ्या ठिकाणी सद्‌गुणी मुलाशी लग्न लावण्याचा विचार करतात. न्यायालयात खटला वर्षानुवर्षे चालत राहातो. मुलीचे वय निघून जाते त्यामुळे दुसरे लग्न करणे सुध्दा अशक्य होते. येथे तर न्याय प्रक्रियेनेच त्या मुलीवर अन्याय केल्यासारखे आहे.

एक विधवा आपल्या लहान लहान मुलांसोबत जीवन कसेतरी कंठत आहे. तिच्या पतीच्या संपत्तीवर कुण्या नातेवाईकाने अवैध कब्जा केला आहे. विधवेला उपजीविकेचे दुसरे साधन नाही. दावा कोर्टात रेंगाळत पडला आहे. निर्णय लागत नाही की विधवेला तिच्या एकमेव उदरनिर्वाहचे साधन प्राप्त होत नाही. अशा स्थितीत ती विधवा आपल्या मुलांचे संगोपण कसे करील?

अनेकदा दावेदार राहतो दुसऱ्या ठिकाणी तर न्यायालय असते दुसऱ्या गावी दुसऱ्या शहरातील ठिकाणी दाव्याची सुनावणी होत असते. वर्षानुवर्षे न्यायालय तारखा देतच राहतात आणि बेचारे दावेदार हेलपाटे मारून मारून त्रस्त होतात. दावेदार तर कधी कधी हे जग सुध्दा सोडून जातात परंतु दावा मात्र चालतच राहातो.

अशा स्थितीत दावेदारांची कंबर मोडून जाते. न्याय प्रक्रियेतील जबाबदार व्यक्तींना हे कळले पाहिजे की लोकांना त्यांचे हक्क त्यांना त्रासदेवून विलंबाने दिले तर तो एक प्रकारचा अन्यायच आहे. अति विलंबाने दिलेला न्याय हा अन्यायच असतो.

*** समाप्त ***